



# छात्र प्रबोधन

सौर आश्विन, शके १९३५। वर्ष १४ अंक १
मूल्य रुपये पंधरा

ज्ञान प्रबोधिनीचे कुमारांसाठी, कृतिशीलता जोपासणारे मासिक !

# छात्र प्रबोधन दीपावली विशेषांक २०१३



## ‘दिवाळी अंक – वितरण व्यवस्था – विशेष निवेदन’

‘छात्र प्रबोधन’ च्या सभासदांसाठी व दिवाळी अंकाची स्वतंत्रपणे नोंदणी केलेल्या वाचकांसाठी **२४ ऑ टोबरनंतर १२० हून अधिक गावांमध्ये दिवाळी अंकांच्या वितरणाची व्यवस्था केली आहे. या सर्वांचे पत्ते या अंकात पृष्ठक्रमांक २८ ते ३२ येथे दिले आहेत.**

दिवाळी अंक जास्तीत जास्त सभासदांना वेळेत व खात्रीशीर मिळावा यासाठी या वितरण केंद्रांची साखळी आपण निर्माण केली आहे. सर्व वितरण केंद्रांवरील केंद्रप्रमुख व कार्यकर्ते स्वयंसेवीवृत्तीने, कोणताही आर्थिक मोबदला न घेता, हे काम हौसेने करत असतात. **आपण सर्व सभासदांनी दिवाळीपूर्वी आपला दिवाळी अंक, हा अंक किंवा छात्र प्रबोधनच्या वर्गणीची पावती दाखवून, संबंधित केंद्रांवरून घेऊन जावा** व दिवाळीच्या सुट्टीत फराळाबरोबरच दिवाळी अंकाच्या वाचनाचा आनंद लुटावा.

---

**छात्र प्रबोधनतर्फे एकाचवेळी ४ दिवाळी अंक प्रकाशित होणार !**
**मराठी, इंग्रजी, ग्रामीण, युवोन्मेष. याशिवाय चारही अंकांची एकत्रित संगणकीय सीडी उपलब्ध !**
**महाराष्ट्र–गोवा मिळून ५० हजारांहून अधिक अंकांची प्रकाशनपूर्व नोंदणी !!**

## ‘छात्र प्रबोधन’च्या आगामी दिवाळी अंकाच्या अंतरंगात डोकावताना...

- रंगतदार, खुमासदार कथा, कविता, ललित लेखांचा खजिना
  डॉ. अरुणा ढेरे, मल्हार अरणकल्ले, मीना वांगीकर, विद्याधर म्हैसकर, डॉ. प्रदीप आवटे, आश्लेषा महाजन, इंद्रजीत भालेराव, संगीता बर्वे, अरुण म्हात्रे,मिलिंद संगोराम, डॉ. संजय ढोले, स्वाती राजे इ. मान्यवरांचा सहभाग
- दैनंदिन जीवनातील विज्ञान, तंत्रज्ञान, अर्थकारण यांवरील माहितीपर लेख.
- ‘संवाद कौशल्य’ या विषयाचा खास विभाग. (संवाद कौशल्य म्हणजे काय? ते कसे वाढवावे, संवादातील अडथळे, समस्या, माध्यमे इ.)
- कधी यश तर कधी जिव्हारी लागणाऱ्या अपयशाचा अनुभव घेऊन त्यातून जिद्दीने, वाट शोधत यशाच्या मार्गावर वाटचाल करणाऱ्या व्य तींच्या प्रेरणादायी अनुभवांची विशेष लेखमाला.
- याशिवाय विनोद, शब्दकोडी, गणितातील कोडी, भाषेच्या गमती, कलाकौशल्य, विज्ञान प्रयोग आणि बरेच काही...
- छोट्या दोस्त मंडळींच्या साहित्यासाठी खास पाने राखीव!

---

**छात्र प्रबोधनतर्फे तीन राज्यस्तरीय स्पर्धा** - इयत्ता ७ वी ते १० वीच्या विद्यार्थ्यांसाठी

**✻ तुम्हीच संपादक व्हा ! हस्तलिखित स्पर्धा**

**✻ ‘माझा गाव’ या विषयावर पीपीटी स्पर्धा ✻ भारतीय भाषांमधील स्फूर्तिगीत समूह गायन स्पर्धा**

प्रवेश नि:शुल्क, जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी या स्पर्धांमध्ये भाग घ्यावा.(तपशील चालू अंकात आणि दिवाळी अंकात पाहा.)

**सर्व स्पर्धांची नोंदणी ३१ डिसेंबर २०१३ पूर्वी करणे आवश्यक/साहित्य सादर करण्याचा अंतिम दिनांक ३१ जानेवारी २०१४**

# छात्र प्रबोधन

**सौर आश्विन, शके १९३५। वर्ष १४ अंक १**

(मासिकाचा प्रारंभ : सौर श्रावण शके १९१४ (जुलै - ऑगस्ट १९९२) २५५ वा अंक, वर्ष २२ अंक ३

प्रकाशन दिनांक - ९ आश्विन, शके १९३५/१ ऑ टोबर २०१३


ॐ

*इवली शल्ये रुपती खुपती*
*मात करू दे त्यांच्यावरती*
*प्रगल्भतेचे पंख देऊनी*
*ने ज्योतिर्जगतात*

## • अंतरंग •


| | | |
|---|---|---|
| २. | **संवाद** | - महेन्द्र सेठिया |
| ३. | कथा ... **बंड्या** | - डॉ. सुमन नवलकर |
| ६. | कविता... **सुसंग** | - सचिन बेंडभर |
| | **मनातले गाव** | - मृणालिनी कानिटकर |
| ७. | माहितीपर... **श तिरूपिणी दुर्गा** | - वाच. लीला दीक्षित |
| ११. | ललित... **सखी होणार ना निर्भय?** | - आश्लेषा महाजन |
| १४. | ललित... **ही सविता... असाही सविता** | - बागेश्री पोंक्षे |
| १६. | **स्पर्धा निवेदन** | |
| १७. | ललित... **देतो तो देव...** | - महेश केळुसकर |
| २०. | कृतिपर... **कागदाचे हेलिकॉप्टर** | - श्रीरंग गोखले |
| २१. | निर्णयातील स्वावलंबन...**५** **होय, निर्णय माझा आहे !** | - वाच. वनिता पटवर्धन |
| २३. | मुलांचे पान... **झुंज...!** | - कु. सिद्धा पाटणकर |
| २५. | विज्ञान तंत्रज्ञानातील कल्पकता... लेखांक-५ **जादुई रूपांतरण** | - वाच. नलिनी गुजराथी |
| २७. | **वेलाला केले गुरू** | - श्रीरंग गोखले |
| २८. | **दिवाळी अंक वितरण- स्थानिक केंद्रांचे पत्ते** | |
| | मुलपृष्ठ पद्य... **आम्ही उसळत्या लाटा** | - वाच. स्वर्णलता भिशीकर |

**याशिवाय -** जरा डोकं चालवा (९), उडणारी परी (१९), लोकरीच्या धाग्यापासून शुभेच्छापत्र (२२), कारंजे (२६)


**मुखपृष्ठाविषयी –** सासवड गावाबाहेरचे, नदीकिनारी असलेले हे हेमाडपंथी भव्य मंदिर! मंद उजेड असलेला शांत गाभारा! नेहमीची जगरहाटी विसरून एकांतात घेऊन जाणारे गूढ वातावरण! हा सारा चमत्कार कुंचल्यात पकडण्यास जरी मी असमर्थ ठरलो तरी चित्र पूर्ण झाल्यानंतर अल्पशा योग साधनेचे समाधान मला मिळून गेले.

नंदी दीपवून टाकणारा व गाभाऱ्यात झिरपत जाणारा तो तेज:पुंज प्रकाश, जणू आध्यात्मिक श ती अशाच प्रकाशातून स्रवत असावी ! महादेवाकडे पाठ करून हे दृष्य टिपताना, जणू त्या विधात्याच्याच नजरेतून हे विश्व पाहात असल्याचा भास होतो.

**– दीपक साळी**


**♦ संपादक, प्रकाशक, मुद्रक ♦**
महेन्द्र सेठिया

**♦ कार्यकारी संपादक ♦**
शिल्पा कुलकर्णी

**♦ अतिथी संपादक ♦**
सुलभा कुलकर्णी

**♦ संपादक मंडळ ♦**
शैलजा देशमुख, नीलिमा करमरकर
डॉ. कांचनगंगा गंधे, आश्लेषा महाजन

**♦ मुखपृष्ठ ♦**
दीपक साळी

**♦ आतील चित्रे ♦**
अभय पुरंदरे



**♦ संपर्क पत्ता ♦**
छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी
५१०, सदाशिव पेठ, पुणे – 411030
☎ (०२०) २४२०७ १७४/१७९

**संकेतस्थळ**
www.chhatraprabodhan.org

**ई-मेल**
chhatraprabodhan@jnanaprabodhini.org



**मासिकाची वर्गणी :** वार्षिक: ₹ १८०, द्वैवार्षिक: ₹ ३४०, त्रैवार्षिक: ₹ ५००, दशवार्षिक: ₹ १,५००.

**या अंकाची किंमत : ₹ १५**
(पुण्याबाहेरील धनादेशासाठी - ₹ २० जादा, घरपोच दिवाळी अंकासाठी प्रतिवर्षी ₹ ४० जादा)


विविध ३३ भाषा व १८ लिपिंमधील रामयणांचा संग्रह ग्रंथ ज्ञान प्रबोधिनीच्या 'संत्रिका' विभागात आहेत. त्याचे तपशील पानाखालील तळटीपेत दिले आहेत.


**या नियतकालिकास महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून अनुदानापोटी काही र कम प्राप्त झाली आहे. परंतु या नियतकालिकात प्रसिद्ध झालेली मते महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळास मान्य असतील असे नाही.**


**मार्गी कंटक तुला बोचतील, ठेचा तैशा अनेक बसतील। प्रसंग नाना निराश करतील, भिऊ नको तू परी।।**

**जाणून घ्या...** ग्रंथ - रामायण, भाषा - प्राकृत, लिपी- देवनागरी, साहित्यप्रकार - काव्य

**छात्र प्रबोधन : निव्वळ मासिक नव्हे !... विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकसनाची चळवळ !!**

## संवाद

*प्रिय शक्तिसंपन्न प्रबोधकांनो,*

*'शक्ती' असा शब्द वाचल्यावर आपल्या डोळ्यासमोर प्रामुख्याने शारीरिक ताकद येते. हो ना? पण नवरात्रीच्या नऊ दिवसांमध्ये आदिमाया, आदिशक्ती, कालीमाता यांचे नऊ शक्तींच्या रूपांमध्ये पूजन केले जाते, हे तुम्हाला माहीत आहे का? महामाया, माता रेणुका, गणेशनंदिनी, मनमोहिनी, ललितागौरी, अन्नपूर्णा, शारदा, महालक्ष्मी आणि महिषासुरमर्दिनी दुर्गा ही ती नऊ रूपे! ज्येष्ठ लेखिका वाचस्पती लीला दीक्षित यांनी त्याबद्दल लिहिलेला एक सविस्तर लेख या अंकात तुम्ही वाचालच! पण नुसते हे शब्द वाचून तुम्हाला कोणकोणत्या प्रकारच्या शक्तींची जाणीव झाली? देवीच्या या विविध रूपांबद्दल पुराणकाळातल्या कथा जरूर समजून घ्या. पण ऐकताना, वाचताना, त्यातला चमत्काराचा भाग बाजूला ठेवून त्यातील रूपकात्मकता, प्रतिकांचा अर्थ समजून घ्यायचा विशेष प्रयत्न करा! आजच्या काळातील प्रत्येक रूपातली उदाहरणं शोधण्याचा आवर्जून प्रयत्न करा.*

*आपल्याकडे प्राचीन काळापासून 'स्त्रीकडे असलेल्या विविध शक्तींची पूजा करण्याची परंपरा, 'नवरात्रोत्सव, शारदोत्सव' या नावाने चालू आहे. काळाच्या ओघात मोठ्या प्रमाणावर पूजेचे उपचार शिल्लक राहिले. त्याच्यामागचा अर्थ, भावना व त्यानुसार आचार कमी होत गेला. आपण सर्व प्रबोधकांनी जाणीवपूर्वक या पूजांमागचा अर्थ, भाव, विचार समजून घ्यायला हवा. आणि हळूहळू त्यातील उदात्त भावनांनुसार स्वत:चे आचार-विचार बदलण्याचा, त्याला अनुरूप करण्याचा प्रयत्न करावा, तसा संकल्प करावा.*

*मुळात स्त्री ही अबला नसून सबला आहे. प्रत्येक मुलीमध्ये वरील सर्व प्रकारच्या शक्ती बीजरूपाने असतातच. काही वेळेला त्याची जाणीव त्यांना झालेली नसते इतकेच! काही वेळेला त्यांना व्यक्त होण्याची संधी मिळालेली नसते तर काही वेळेला चुकीच्या रुढी, बाह्य वातावरण, कौटुंबिक-सामाजिक प्रतिकूल परिस्थिती यामध्ये अडथळे निर्माण करतात. काही वेळेला असंही होतं की, जाहिरातबाजीच्या भुलभुलैय्यामुळे मूळ शक्तींचा विसर पडून अनेक जणी नको त्या आकर्षणांमागे धावण्याच्या शर्यतीत स्वत:ला ढकलून देतात. 'छात्र प्रबोधन'च्या वाचक प्रबोधिका, विद्यार्थिनींनो, तुमच्या बाबतीत यातलं काही घडत नाहीये ना! तुमच्यातल्या मूळ शक्तीची जाणीव होण्यासाठी अनेक प्रकारच्या उपक्रमांमध्ये पुढाकार घेऊन सहभागी व्हा! तुमच्या आसपास वरीलपैकी एक वा अधिक प्रकारची शक्ती ज्या मुली-युवती-स्त्रियांमधून प्रकट झाली त्यांच्या भेटी घ्या. त्यांच्या सहवासात राहा. त्यांच्या कथा वाचा, पाहा, ऐका. त्यातून तुमच्यात असलेल्या शक्तींची जाणीव व्हायला तुम्हाला मदत होईल. हे आपणही करू शकू असा आत्मविश्वास वाढायला लागेल आणि मग या शक्ती अधिकाधिक अंशाने प्रकट करण्यासाठीची प्रेरणाही तुम्हाला मिळेल. 'छात्र प्रबोधन' त्यासाठी तुम्हाला वारंवार आठवण करत राहील आणि मदतही करत राहील.*

*सर्व प्रबोधकांनी, मुलांनीही शक्तीची ही विविध रूपे समजून घेत त्यांचा मनापासून आदर करायला हवा. या शक्ती प्रकट करण्यासाठी मुलींना प्रोत्साहन द्यायला हवं. त्यासाठी त्यांच्याकडील कामे वाटून घ्यायला हवीत. मुलींची छेडछाड, त्यांची टिंगलटवाळी, त्यांना कमी लेखणे, त्यांचे शोषण, त्यांच्यावरील अत्याचार, स्त्री-भ्रूण हत्त्या याला कडाडून विरोध करण्यातच खरी मर्दुमकी आहे, हे लक्षात घ्यायला हवं. याची सुरुवात आपल्या घरापासून, आपल्या शाळेपासून, आपल्या वाडा-सोसायटी-गल्लीपासून करायला हवी. असं करणं म्हणजे 'शारदोत्सव' साजरा करणं. या अंकातले काही लेख तुम्हाला असा 'शारदोत्सव' साजरा करायला नक्कीच मदत करतील.*

*छात्र प्रबोधनच्या कार्यालयात दिवाळी अंकांच्या निर्मितीसाठीची लगबग आणि गावोगावच्या कार्यकर्त्यांची प्रकाशनपूर्व नोंदणीसाठीची धावपळ चांगलीच वाढली आहे. मला खात्री आहे तुम्हीही या अंकांची आतुरतेने वाट पाहात असाल!*

*अर्थपूर्ण शारदोत्सव साजरा करून शक्तिसंपन्न व्हायला अन् विजयादशमीच्या निमित्ताने सीमोल्लंघन करायला मनापासून शुभेच्छा!*

**सस्नेह तुमचा,**

**(महेन्द्र सेठिया)**



आता इथे ज्ञानाचीही उजाडे पहाट। नव्या माणसाची इथुनी निघे पायवाट।।

**जाणून घ्या...** ग्रंथ - रामायण, भाषा - मराठी , लिपी - देवनागरी, साहित्यप्रकार - कादंबरी / काव्य / निबंध / कोश



प्रायोजक - व्ही. व्ही. आर्किटे ट प्रा. लि., पुणे.

# बंड्या

– डॉ. सुमन नवलकर



मी एकटी होते तेव्हा सगळं चांगलंच होतं. माझेच सगळे लाड होत होते. मी मागितलं की लगेच मिळायचं सगळं. पण सखी आली आणि बदलतच गेलं सगळं. सुरुवातीला मला वाटायचं की ती लहान आहे, म्हणून तिचे लाड होतायत. पण मग लक्षात आलं की ती कायमच लहान राहणार माझ्यापेक्षा. शिवाय सखी मोठी होत चालली तसे तिचे लाड कमी होण्याऐवजी उलट वाढायलाच लागले.

सखी गोरी पान. हॉस्पिटलात पाहिलं तर अगदी सशाच्या पिल्लासारखीच वाटत होती. आजी तर म्हणाली देखील, ''इतका कसा गं दोघींच्या रंगात फरक?'' दोघी कोण ते तेव्हा कळलं नव्हतं. मग हळूहळू कळायला लागलं. दोघी म्हणजे मी आणि सखी, आता मी गोरी नाही, ती काय माझी चूक?

सखी शाळेत जायला लागल्यावर तिचे लाड करायला या लोकांना आणखी एक कारण मिळालं, तिची हुशारी, सखीचा नंबर कायम पहिला. आता मी हुशार नाहिये, तर ती काय माझी चूक? अभ्यास करते मी, गणितं सोडवते, कविता पाठ करते, प्रश्नांची उत्तरंही पाठ करते,पण सगळं विसरायलाच होतं. मग आजोबा म्हणणार, 'शीक जरा तिच्याकडून, धाकटी बहीण आहे ना तुझी?' सखीला तिचा अभ्यास तर येतोच, पण मी माझा अभ्यास करते, तो ऐकून तिचा तोही पाठ होतो. मी कवितेची ओळ विसरले तर सखीच म्हणून टाकते. मोठी मोठी इंग्लिशची स्पेलिंग पटापटा सांगते. गणित तर एकही चुकत नाही तिचं. मग करणारच ना सगळे तिचंच कौतुक?

माझ्या लहानपणी बाबा मला 'बंड्या' म्हणायचे. ऑफिसातून आल्या आल्या विचारायचे, ''काय बंड्या काय म्हणतोस?'' मी आत कुठेही असले, तरी त्यांची हाक यायची, ''बंड्याऽऽऽऽ, कुठे गेला आमचा बंड्या?'' पण हल्ली बाबा मला 'ताई' म्हणतात. सखीने मला 'ताई' म्हणावं म्हणून सगळे मला 'ताई' म्हणायला लागले आणि माझं नावच पडलं 'ताई'. कधी तरी बाबांनी म्हणावं ना 'बंड्या' पण छे! सखीला अधून- मधून सखू, सखोबा असं काय-काय म्हणतात, मी मात्र 'ताईच'!

सगळ्यांनी 'हुशार', 'सुंदर' म्हणून-म्हणून सखीला 'ग'ची बाधा की काय ती झालीय. सदा तोऱ्यातच असते. हाक मारताना 'ताई' म्हणणार, पण पुढचं सगळं तोऱ्यातच. म्हणजे, 'ताई, माझा केसांचा बँड कुठेय?, ताई माझ्या बुटावर बुट कोणी ठेवले?, ताई आंघोळीला आधी मी जाणार, ताई माझ्या पुस्तकाचं पान कोणी चुरलं?, ताई, माझ्या पेन्सिलीचं टोक कसं तुटलं ?'

तर त्या दिवशी आजोबा म्हणाले,''दे ना तिच्या पेन्सिलीला टोक करून, ताई आहेस ना तिची?'' आता मी काय देणार नाही का टोक करून? ते तर माझ्या आवडीचं काम. टोक यंत्रामधून पेन्सिलीच्या लाकडाचं अख्खं-अख्खं फूल काढता येतं मला. टोक तुटलं तर पुन्हा अख्खं फूल. बघता-बघता पेन्सिल छोटी होत जाते. आणि लाकडाची फुलंच



हिरव्या रानात, पिवळ्या उन्हात जीव उधळून भुलायचं। पाखरू होऊन पाखराशी बोलायचं।।

**जाणून घ्या...** ग्रंथ - रामायण, भाषा - आसामी, लिपी - आसामी, देवनागरी, साहित्यप्रकार - काव्य



प्रायोजक – कु. रेवती सारंग वऱ्हाडपांडे, पुणे.



फुलं. मग आजोबा पुन्हा म्हणणार, ''साधं टोकही करता येत नाही का तुला? केवढीशी करून ठेवलीस तिची पेन्सिल.''

खेळांमधे मात्र मी आहे ताई नव्हे 'दादा'!! धावण्याच्या शर्यतीत, अडथळ्यांच्या शर्यतीत पहिली येणार म्हणजे येणार. कबड्डी खेळतांना चौघांना तरी बाद करणारच. जत्रेत गेले तर बंदूकीचे फुगे फोडणारच. जायंटव्हील मधे बसले तर घाबरणार नाहीच. लंगडी, पकडापकडी कशातही राज्य आलं, की सगळ्यांना पटापट आऊट करणार. क्रिकेटच्या शाळेच्या टीममधे मी असणारच. त्याचं तरी कौतुक करावं ना कोणी? पण आजी म्हणणार, ''धटिंगण कुठली, मुलगा म्हणूनच यायची होती जन्माला. ती चुकून मुलगी म्हणून जन्मली. ''

त्या दिवशी शाळेत कबड्डीत पडले. ढोपराला खरचटलं. शाळेत बाईंनी जखम साफ करून औषध लावलं. बँडेज बांधलं. पण घरी आल्यावर आजी पट्टी पाहून म्हणालीच,''सांगितलं होतं कोणी कबड्डी खेळायला?''

आईनं मात्र ऑफिसातून आल्यावर पट्टी-कापूस काढून जखम पुन्हा साफ केली. औषध लावून पट्टी बांधली म्हणाली, ''दुखतोय का पाय राखी?'' मी मान हलवली.

''शूर आहे माझी राखी. पडेल तो वाढेल, घाबरायचं नाही. मुद्दाम मात्र पडायचं नाही हो. जास्त लागलं तर फ्रॅ  चर पण होतं ना? हाडांना दुखापत होऊ शकते.'' मी मान हलवली. हुशार नसले तरी इतकं तर कळतंच ना मला.

तर झालं असं, की अख्खं घर मन्नी आत्याच्या लग्नासाठी म्हणून सकाळीच बाहेर पडलं. आई-बाबा तिथून परस्पर ऑफिसला गेले. आम्ही बाकी सगळे घरी आलो. दुपारी थकून आजी-आजोबा झोपले. सखीला व  तृत्व स्पर्धेसाठी शाळेत जायचं होतं. तिथून बाई स्पर्धेसाठी दुसऱ्या शाळेत घेऊन जाणार होत्या. गणवेश घातला आणि शाळेचे बूट घ्यायला म्हणून सखीने गॅलरीचा दरवाजा उघडला, तर गॅलरीत मधमाश्या. ती तशीच मागे आली. मी पटकन पुढे होऊन दरवाजा बंद केला. कुंड्यांखालची जमीन नीट पुसून घेता यावी म्हणून आईने उंच तिवयांवर कुंड्या ठेवल्यात. त्यांपैकी कढीलिंबाच्या कुंडीखाली मधमाश्यांनी पोळं करायला घेतलं होतं. आता कुंड्यांच्या पलीकडच्या रॅकमधून सखीचे बूट कसे काढायचे? आजी-आजोबा झोपलेले आणि आत्ता बस येईल सखीला न्यायला.

तेवढ्यात मला बेसिनखालच्या औषध फवारायच्या पॉयशाची आठवण झाली. मी पॉयशा आणून दार उघडायला जाणार तेवढ्यात काही सुचून पुन्हा मागे आले. पलंगावरची चादर अंगावर गुंडाळली आणि पॉयशा मारत मारत दार उघडलं. काही मधमाश्या पटापट मरून पडल्या, काही उडाल्या. तशीच पुढे होऊन सखीचे बूट घेतले आणि पटकन आत येऊन दरवाजा बंद केला.

खाली बसवाला हॉर्न वाजवत होता. पटकन बूट घालून सखी

भोळा भाबडा हा भाव होता अंतरी जपला। उजेडाच्या भेटीसाठी सारा अंधार गिळला।।

**जाणून घ्या...** ग्रंथ - रामायण, भाषा - बंगाली, लिपी - बंगाली, देवनागरी, साहित्यप्रकार - काव्य

**प्रायोजक – श्री. अजित भिडे (डायरे  टर, ॲसेंट हॉस्पिटॅलिटी प्रा. लि.) पुणे ☎ २५३८०४०६**

पळाली. चादर अंगावरून काढताना मला जाणवलं की, आपण जरा जास्तच धीटपणा केलाय. साबण लावून हात-पाय धूत असतानाच आजी आली. ''औषधाचा वास येतोय. पॉयशा मारलाय का कोणी?'' पाठून आजोबाही खोकत-खोकत आले. त्यांना वासाने खोकला येतोच. ''सखी गेली का शाळेत?'' आजीने विचारलं.

''हो आजी. आणि औषध मी मारलंय गॅलरीत. उघडू नको तो दरवाजा.''

''अगं राखी, मुंग्यांसाठी बोलवायचंय ना पेस्टकंट्रोलवाल्यांना? तू नको बाई हात लावू त्या पॉयशाला. विषारी असतं ते औषध.''

''अगं, पण सखीचे बूट होते ना तिथे?'' मी मधमाश्यांची गोष्ट आजी-आजोबांना सांगितली. आजी थरथरायलाच लागली. ''अगं, आम्हाला उठवायचं. '' आजोबांना बोलणंच सुचेना.

''आजी, अगं बसची वेळ झाली होती ना.'' संध्याकाळी सखी पहिल्या बक्षिसाची ट्रॉफी घेऊनच आली. आल्या-आल्या मला मिठी मारून म्हणाली,''ताई, आज तुझ्यामुळे पहिलं बक्षिस मिळालं मला! बुटांशिवाय कशी गेले असते मी स्पर्धेला?''

''अगं, पण छानपैकी भाषण तूच केलंस ना?'' मी म्हटलं

''काही म्हणा. पण आज राखीनं केलं ते तर आम्हाला झोपेतून उठवलं असतं तरी सुचलं नसतं.'' आजोबांनी कबुली दिली.

''हो. पण राखीलाही दिलं नसतं असलं काही करायला. मधमाश्या चावल्या असत्या म्हणजे?'' आजी काळजीने म्हणाली. आजोबांनी मधमाश्यांची गोष्ट बाबांना फोनवर सांगितली होतीच. आता सखीच्या बक्षिसाची पण सांगितली.

आज खूप दिवसांनी घरी आल्या आल्या बाबांची हाक आली, ''बंड्याऽऽऽ बंड्या कुठेय आमचा?'' मी आले तर बाबांनी माझ्या पाठीत इत या जोरात शाबासकीची थाप मारली की हादरलेच मी. जणूकाही मधमाश्यांना हाकलणारी मी, म्हणजे माझ्यात हत्तीचं बळच संचारलं होतं.

''वा! पठ्ठे बंडूराव. मर्दुमकीच केलीत तुम्ही.'' बाबांचा आवाज ऐकून सखीही आली. मग बाबांनी म्हटलं, ''या सखुबाई, अभिनंदन. पहिला नंबर आला ना?'' बाबांनी तिच्या पाठीवर हळूच, फुंकर मारल्यासारखी थाप मारली. मोठ्ठी थाप मारली तर कोलमडेलच ना ती!!

''काही म्हण, सखुबाई भाषण करण्यात शूर! पण माश्या हाकलण्यात माझा बंड्याच शूर''



सखीने मान डोलावली. मला पुन्हा मिठी मारली. तेवढ्यात आईही आली. तिने आमच्या दोघींच्याही हातात एकेक मोठ्ठं चॉकलेट दिलं. दोघींनाही जवळ घेतलं. पण ती माझ्याकडेच पाहत होती. मला घट्ट मिठी मारून म्हणाली,''असलं भलतं धाडस करू नये राखी. माश्या चावल्या असत्या म्हणजे?''

''आपल्या सखीच्या बसची वेळ झाली होती नं आई.''

रात्री मी झोपले असं वाटून ती बाबांना सांगत होती,''खरी गुणाची आहे माझी राखी. खरी शूर, खरी नि:स्वार्थी.'' आणखी बरंच काही बोलली ती. सगळं काही आता नीट आठवत नाही. पण बाबांचं एक वा य मात्र नीट आठवतं, ''हो मग? 'बंड्या' आहे तो आमचा.''

♣♣

**- डॉ. सुमन नवलकर**
ए/२०, ज्योती बिल्डिंग,
बरकत अली दर्गा मार्ग,
वडाळा(पूर्व), मुंबई 37



अगाध किमया तुझीया हाती। फुलविसी मातीतून मोती।।

**जाणून घ्या...** ग्रंथ - रामायण, भाषा - डोंगरी, लिपी - देवनागरी, साहित्यप्रकार - कथा




**प्रायोजक - श्री. चिंतामणी बने, डोंबिवली.**

# सुसंग

*केव्हा कशी जुळावी*
*नाती कधी कुणाची*
*कोणी म्हणोत काही*
*ही ठेव संचिताची ।।*

*कधी पुष्प ताटव्यात*
*फिरे पिसाट वारे*
*फुलासवे मिळे त्या*
*सुगंधी रूप न्यारे ।।*

*लोहा परीस भेटे*
*सोडोनी मूळ वर्ण*
*टाकून नीज रूपा*
*होते लोहही सुवर्ण ।।*



*जैसा मिळे तयाचा*
*पाण्यास लागे गुण*
*कधी वाहते गटारी*
*कधी भागवी तहान ।।*

*दैवात, लाभ ज्याला*
*त्याला मिळे सुसंग*
*बहरून येई तेथे*
*कर्तृत्व जे उत्तुंग ।।*

**– सचिन बेंडभर**
पिंपळे जगताप. ता. शिरुर,
जि. पुणे – ४१२२०८

---

# मनातले गाव

धु याने वेढलेले गाव, ह्या डोळ्यांमध्ये वसते
उतरती वाट वळणाची, स्वत:शी का बरे हसते?

मान उंचावून झाडे, नभाशी बोलती काही
सावळ्याच्या मिठीमध्ये, बुडाली गर्दशी राई!



कसे काळीज कातोनी, फत्तराने दिले पाणी
रुंद छातीवरी त्याच्या, फुलांनी कोरली गाणी!

लपेटून पर्वताला त्या, पहुडली शांत ही सरिता
लहर उठते हळू हृदयी, सुखाचे चांदणे स्मरता!

बिलगुनी एकमेकांना, ऊब देती घरे सारी
झुकवुनी छप्परे खाली, ऋतुंच्या झेलती लहरी!

इथे जी माणसे येती, डोलणारी पिके होती
भुकेल्याच्या मुखी चारा, मनाला तृप्तता देती!

'दयाघना' तू इथे यावे, धरेवर मु त बरसावे
डोलणाऱ्या पिकांसाठी, नव्याने रान भिजवावे !

**मृणालिनी कानिटकर–जोशी**
फ्लॅट नं. ३४, एफ ३ विंग
वृंदावन पार्क सोसायटी, महात्मा सोसायटीजवळ
कोथरुड, पुणे ४११०३८

**प्रत्येक क्षण घे वेचुनि, यत्नात जा नित दंगुनि। घे जिद्दीने यश खेचुनी, होईल सार्थक जीवनी।।**

**जाणून घ्या...** ग्रंथ - रामायण, भाषा - गुजराथी, लिपी - गुजराथी, देवनागरी, साहित्यप्रकार - कथा / काव्य

दात मजबूत राखण्यासाठी दातांची नियमित निगा राखा. **प्रायोजक – डॉ. कीर्ती आपटे, पुणे.**

‘स्त्री श ती’ हा आजचा शब्द नाही. अनादि काळापासून या स्त्री श तीचा महिमा सर्वांना ज्ञात आहे. शारदीय नवरात्र म्हणजेच या स्त्री श तीचा उत्सव! अंबा भवानी, महिषासूरमर्दिनी अशी अनेक नावे जगन्माता पार्वतीला दिली गेली आहेत. देवीचे रूप म्हणून आपण तिला अष्टभुजा बहाल केल्या. नवरात्रात देवीच्या या नऊ वेगवेगळ्या रूपाची उपासना केली जाते. पूजा बांधली जाते. देवीच्या नऊ दिवसांच्या विविध रूपांविषयी आणि त्या प्रतिकांचा आजच्या काळाशी सुसंगत असलेला अर्थ **शा तिरूपिणी दुर्गा**, या लीला दीक्षित यांच्या लेखातून आपण जाणून घेणार आहोत.



इवल्या कळीपासून ते आत्मनिर्भर स्त्री असा विविध कवी, कवयित्रींच्या साहित्यातून शब्दबद्ध झालेला स्त्रीचा प्रवास! वाचूया या विषयावर काही निवडक कवितांचं रसग्रहण करणारा कवयित्री आश्लेषा महाजन यांचा लेख, **सखी होणार ना निर्भय?**

देवीसारख्या अष्टभुजा आपल्याजवळ नाहीत. तिच्या हाती असणारी आयुधेही आपल्यापाशी नाहीत! तरीही आज आपल्यापाशी फार मोठी श ती आहे; ती म्हणजे आपला आत्मविश्वास! याच आत्मविश्वास आणि जिद्दीच्या जोरावर ‘सविता’ने प्रतिकूलतेवर मात करत आपलं डॉ टर बनण्याचं स्वप्न पूर्ण केलं. आज जिथे वैद्यकीय सेवा अभावाने मिळते, मिळाली तरी परवडत नाही; अशा लोकांसाठी सविताने रुग्णालय उभारलं. वाचूया तिची कहाणी **ही सविता... असाही सविता** या बागेश्री पोंक्षे यांच्या लेखातून...

नवरात्रीचे हे नऊ दिवस आपल्याला काय सांगतात? आपल्या मनाचा कमकुवतपणा, अगतिकपणा दूर सारून ‘सर्व दु:ख हरे देवी,’ अशी तिची प्रार्थना करण्यापेक्षा ‘मीच स्वत: दु:ख हारिणी’ होईन असा निर्धार केला पाहिजे. श्रद्धा आणि श ती हीच जगदंबेची रूपे आहेत, हे ध्यानी ठेवल्यास आपले ध्येय आपण आत्मनिर्भर होऊन सहज साध्य करू शकतो.

---

# शा तिरूपिणी दुर्गा

**– डॉ. लीला दीक्षित**



लावण्यसुंदर ऋतू म्हणजे शरदऋतू. आश्विन येतो तो ‘शरदा’ला घेऊनच. सतत तीन महिने बरसणारा पाऊस लहान मुलासारखा गप्प होतो. दिवसभर त्या गर्भवतीसारखी सृष्टी कांतिमय होते. आकाश स्वच्छ निरभ्र, नितळ, निळेभोर दिसू लागते. परमेश्वर नक्षत्रांची सारी झुंबरे उजळतो. अशा या पार्श्वभूमीवर घराघरात अवतरते आदिश ती. घर उत्साहाने भरून जाते.

घरात आणि मंदिरात घटस्थापना होते. वेळूच्या हिरव्यागार बसकट रोवळीत मऊ मातीमध्ये धान्याचा औसा पेरला जातो. कोकणात आम्ही साळ पेरतो. शहरात, विदर्भात गहू पेरतात. पेरलेल्या औश्यावर मधोमध घट ठेवला जातो. लख्ख घासलेला पाण्याचा भरलेला तांब्याचा गडवा असतो. हाच घट. काही ठिकाणी मातीचा घट ठेवतात. (तेच बरोबर, तो पाझरतो. पेरलेले धान्य पटकन उगवते) या घटात हिरवीगार विड्याची पाने गोलाकार उभी ठेवतात. घटात सुपारी, पैसा, हळकुंड टाकायचे. घटाला



हळदीकुंकू लावायचे. अशी सृजनाची माऊली आदिश ती घरी अवतरते. नंदादीपाच्या शांत प्रकाशात, घंटेच्या आणि झांजांच्या तालावर घरातील सर्व माणसे आरती म्हणतात नरहरीची 'दुर्गे दुर्घट भारी' आरती !

आज मी तुमच्याशी बोलणार आहे ते या आदिश तीच्या विविध रूपांबद्दल.

नवरात्राच्या पहिल्या दिवशी ही आदिश ती दुर्गा, **महामाया** या रूपात प्रवेश करते. घराचे महन्मंगल करणारी ही महामाया.

दुसऱ्या दिवशी ती **माता रेणुका** रूपात भेटते.

तिसऱ्या दिवशी तिचे रूप फार सुंदर असते. ती **गणेशनंदिनी** असते. महन्मंगल मातृरूपात गणेश नंदिनी म्हणून ती घरात अवतरते. तिचे गणेशनंदिनी रूप मला फार लोभस वाटते.

चौथ्या दिवशी ती असते जगन्माता **मनमोहिनी.** स्त्रीच्या लावण्याची एक श ती असतेच ना! मनमोहिनी हे तिचे रूप पतिपत्नीमधील प्रगाढ, पवित्र प्रेम अधोरेखित करते. सुंदर जरीचे परकर पोलके नेसून तुम्हाला तुमची बहीण ओवाळते. कधी आई ओवाळते, किती सुंदर दिसतात त्या. तेच रूप 'मन मोहिनी' रूप.

पंचमीच्या दिवशी ती असते कोमल मुग्ध अशा कन्या रूपात. **ललितागौरी** रूपात. म्हणूनच ललिता पंचमीला घरातील, कधी शेजारील कुमारिकेला न्हाऊ माखू घालतात. नवे कपडे देतात. हातात बांगड्या घालून केसात गजरा घालतात. गळ्यात सोन्याची, पुतळामाळ घालतात अशा या सजलेल्या मुलीला आई ओवाळते. आई तिला, अर्थात सर्वांनाच गोडधोड खाऊ घालते. घर सुंदर करणारे तिचे हे ललितागौरी रूप.

नवरात्रीतील षष्ठीला ती असते **अन्नपूर्णा** रूपात. तुमच्या देवघरामध्ये तुम्ही पाह्यलंय न्याहळून? तिथे तुम्हाला ही भेटेलच. घरात ती आईच्या रूपात – अन्नपूर्णा रूपात भेटत असते. कुटुंबाचे आरोग्य जपणारे, घरातील माणसांना सत्वसंपन्न जेऊखाऊ घालणारे तिचे हे अन्नपूर्ण रूप, वत्सल रूप महत्त्वाचे आहे.

मुलगी सासरी जाताना ती लग्नात गौरीहर पूजन करते. त्यामध्येही अन्नपूर्णा असते. तिच्या एका हातात पळी आणि एका हातात पात्र असते कशाला माहीत आहे? आईच्या रूपाने तुम्हाला छान खाऊपिऊ घालावे म्हणून. उत्तम स्वयंपाक करणाऱ्या स्त्रीला म्हणूनच 'अन्नपूर्णा' म्हणतात.

नवरात्रातील सप्तमीला तिचे रूप असते– **शारदा.** शारदा म्हणजे सरस्वती. विद्येची देवता. सर्व कलांची देवता. साहित्य, संगीत, चित्र, नृत्य आणि शिल्प या पाच ललित कलांची ती देवता आहे. ललित कला जीवनात केवढा मोठा आनंद निर्माण करतात.

शारदोत्सव प्रतिपदेलाच सुरू झालेला असतो. माझ्या बालपणी शाळेत शारदोत्सव असे.बालपणी शाळेत व तृत्व स्पर्धा असे, रांगोळी स्पर्धा असे, कविता स्पर्धा असे. त्याचा आनंद मला आज ऐंशीव्या वर्षीसुद्धा पुरतोय. या दिवशी नवरात्रात, घरी आणि मंदिरात संगीताचा कार्यक्रम होत असे. कलेचा आनंद हा आत्म्याला स्पर्श करणारा आनंद. म्हणून तो चिरकाल टिकतो.



**तुम्हीच तुमचे भाग्यविधाते, राष्ट्राचे आधार। तुम्हीच तुमच्या प्रगतीसाठी ठेवा दृढ निर्धार।।**

**जाणून घ्या...** ग्रंथ - रामायण, भाषा - कानडी, लिपी - कन्नड, देवनागरी, साहित्यप्रकार - काव्य

**प्रायोजक – श्री. ऋषिकेश कुलकर्णी, पुणे.**

अष्टमीला तिचे रूप असते– **महालक्ष्मीचे.** महालक्ष्मी म्हणजे वैभवाची देवता. 'महालक्ष्मी'चे वैभवरूप विशाल आहे. पैसा, घर, शेती, गाई–म्हशी परसातले पाळीव प्राणी, पक्षी, सोने, नाणे, बागायत हे सर्व या वैभवात येते. हे सर्व पवित्र मार्गाने यावे म्हणजेच घरात महालक्ष्मी नांदते. महालक्ष्मी येते ती पुढील दाराने, सोनपावलाने वाजत गाजत.

नवमीला तिचे रूप आहे– **महिषासुरमर्दिनी दुर्गा.** असुर याचा अर्थ जगातील वाईट श ती. त्यांचा संहार या रूपात ती करते. तिचे हे रूप नयनमनोहर नाही. बंगालमध्ये तिला या रूपात 'महाकाली' म्हणतात. महिषासुराचा वध झाल्यावर ती थयथय नाचते. अशुभांचा अंत झाल्याचा तो आनंद होतो म्हणून ती नाचते.

अशी ही देवींची रूपे !

दसऱ्याला सर्वत्र आनंद पसरतो. झेंडूच्या माळांनी घर सजते. घटाचे विसर्जन केले जाते. हा दिवस आपण शतकानुशतके आनंदाने साजरा करीत आहोत.

या नऊ श तींमध्ये एक प्रतिकात्मक अर्थ दडलेला आहे. तो जाणून आजच्या स्त्रीने कार्यरत व्हायला हवे. स्त्री ही एक जीवन मंगल करणाऱ्या सामर्थ्याचा स्रोत आहे. जगामध्ये भ्रष्टाचार, अनाचार यांचे राज्य वाढते आहे. स्त्रीने महषिासुरमर्दिनी व्हायला हवे. जगातील अपवित्र गोष्टींचा, भ्रष्टाचार, अनाचार या पापांचा नायनाट करायचा असेल तर राजकारणात, समाजकारणात पुढाकार घेऊन महाकाली बनून आपले सामर्थ्य दाखवायला हवे. दीन दुबळे, अपंग, दारिद्र्याने गांजलेली अनेक माणसे देशात आहेत. त्यांना अन्नपूर्णेच्या मायेने पोटाशी धरायला हवे.

आज टीव्हीवरील स्त्रियांची सौंदर्यप्रदर्शने पाहून मन उबगून जाते. कधी होणार स्त्रियांना आत्मश तीचा साक्षात्कार? कै. श्रीमती विजया लवाटे, श्रीमती सिंधूताई सपकाळ या स्त्रिया गणेशनंदिनी रूपात आजही भेटतात. 'अन्नपूर्णा'रूपात ती घराघरात सतत नांदत असतेच.

अन्यायाविरुद्ध पेटून उठण्यासाठी तिने 'महाकाली', 'चंडी' रूपात अवतरायला हवे.

खूप स्त्रिया ललित कलेच्या क्षेत्रात आज आहेत. पूर्वीही होत्या. आज अनेक स्त्रिया लेखिका आहेत. ही सारी स्त्रीची – शारदेची अंशात्मक रूपं मानायला हवीत. ज्ञानपीठविजेत्या 'महादेवी वर्मा' यांना मी साक्षात भेटले. त्यांच्याशी बोलले तेव्हा मला वाटले, आज प्रत्यक्ष 'शारदा' रूपात मी त्यांना पाहाते आहे. त्यांचे बोलणे धीरगंभीर, शांत. ज्ञान आणि मानवी संवेदना याचा अपूर्व मेळ त्यांच्या बोलण्यातून भेटत होता. आज संगीताच्या क्षेत्रात खूप स्त्रिया आहेत. त्या साऱ्यांमध्ये मला शारदेची रूपे दिसतात.

स्त्री ही महन्मंगल आहे ! स्त्रीच्या मातृरूपाचे सुंदर वर्णन 'कवी यशवंत' यांनी केले आहे –

*आई, तुझ्याच ठायी। सामर्थ्य नंदिनीचे।*
*माहेर मंगलाचे। अद्वैत तापसाचे,*
*गांभीर्य सागराचे। औदार्य या धरेचे।*
*नेत्रात तेज नाचे। त्या शांत चंद्रिकेचे।*
*वात्सल्य गाढ पोटी। त्या मेघ मंडळाचे।*
*वास्तव्य या गुणांचे। आई तुझ्यात साचे।*

♣♣

**– डॉ. लीला दीक्षित**
ध्रुव- ४९/२ सहजानंद सोसायटी,
कोथरुड, पुणे 411038

## जरा डोकं चालवा...

एका सांकेतिक भाषेत–
शिवाजी = १३९ महाराजा = ४७६५
शिराळा = १६८ असे लिहितात. यावरून –

अ) सांकेतिक भाषेत 'वारा' हा शब्द कसा लिहाल?

१) ६३ २) ६९
३) ३६ ४) ७६

ब) '३१४' या अक्षरापासून एका गावाचे नाव तयार होते, ते कोणते?

१) वाशिम २) वाशिर
३) शिवार ४) वामशि

(उत्तरे इतरत्र)

स्वदेश सेवे वाचुनि दुसरा हृदयी भाव नसावा। मनामनांतुनि असला नित संस्कार घडावा।।

**जाणून घ्या...** ग्रंथ - रामायण, भाषा - काश्मिरी, लिपी - काश्मिरी देवनागरी, साहित्यप्रकार - काव्य

**प्रायोजक – सौ. नंदिता सदाशिव वझे, पुणे.**






वादळ वारा आला तरी, प्रकाशाची वाट पाहावी। क्षण कसोटीचा आला तरी उरातली जिद्द जपावी ।।



**जाणून घ्या...** ग्रंथ - रामायण, भाषा - मल्याळम, लिपी - मल्याळम देवनागरी, साहित्यप्रकार - काव्य

**पाचवी ते नववीसाठी मानसपट मापन -** प्रज्ञा मानस संशोधिका, ज्ञान प्रबोधिनी, पुणे ☎ ०२०-२४२०७१४५

# सखी होणार ना निर्भय?

**– आश्लेषा महाजन**



*इटुक्क इवली भिंगरभावली*
*बुब्बुळ बिजली काळीभोर,*
*चिटुक्क चिमणी चुटुक्क जिवणी*
*खळकन् हासू फुटे बिलोर'*

लावणी इवलीची' मधल्या कवी **वसंत बापट** यांच्या या मजेदार पं  ती आपल्याही ओठी हासू फुलवतात. अशी ही खट्याळ चिमणी पोर बघता बघता दिसामासी मोठी होते. कवी **मंगेश पाडगावकर** म्हणतात–

*दिवस तुझे हे फुलायचे, झोपाळ्यावाचून झुलायचे*

खरंच! पाकळीपाकळीनं फुलावं तशीच फुलते ही 'फुलराणी...' अगदी बालकवींच्या 'फुलराणी' सारखीच ती उन्हापावसात, वाऱ्या–धु  यात डोलू लागते. संवेदनांनी डवरते, वेदनांनी कोमेजते. उंबरठ्याबाहेरचे भलेबुरे अनुभव घेतल्यावर ती थोडी शहाणीही होते. कवयित्री आश्विनी गुरव मात्र झो यावर बसून अल्लडपणानं नको ते धाडस करू इच्छिणाऱ्या मुलीस सांगते–



*हात पोचण्या आभाळी*
*नको घेऊस गिरकी*
*तोल एकदा का गेला,*
*होते जमीन परकी*

आपल्याच घरातही बऱ्याचदा मुलींना अकाली मोठं व्हावं लागतं. परिस्थितीच्या रेट्यामुळे तिला कष्टांमध्ये बुडावं लागतं. बालकामगारच जणू ती! मीच लिहिलेय त्यांच्याविषयी–

*किती लवकर, मोठ्या होतात चिमुरड्या मुली*
*आईआजीच्या तालमीत सावरतात घरं*
*नि सांभाळू लागतात चुली...*

समाजात वावरतानाही मुलींना कळत–नकळत बरेच काही सहन करावे लागते. कधी वाईट नजरा तर कधी अर्वाच्य शब्द. कधी दुय्यमत्व तर कधी अपमान. तिनं सतत सावध असावं, असंच जणू भोवतालचं वातावरण. कवयित्री **शैला सायनकर** लिहितात–

*पाखरांनो, आता निरोप घ्या!*
*वस्तीवरल्या गोफणीतून*
*दगड सुटू लागलेत....!*

स्त्रियांवर होणारे अन्याय, अत्याचार, बलात्कार हे काही सुसंस्कृत समाजाचे लक्षण नाही. स्त्री आणि पुरुष हे काही एकमेकांचे शत्रू नाहीत. मित्र आहेत, असावेत. दोघांमध्ये निर्भय, निर्भर, नि:शंक असे वातावरण हवे. स्वातंत्र्य, समता, बंधुता ही केवळ भाषणात वापरण्याची मूल्यं नाहीत. 'राज्यघटना' आपल्या रोजच्या जगण्यात प्रतिबिंबित नको का व्हायला?

आकाशात उंच भरारी घेणाऱ्या पक्ष्याला पुन्हा घरट्याची ओढ लागतेच. जगण्यात मोकळेपणा हवा तशी बंधनंही हवीत. उंच मनोरे बांधताना त्याचा पाया खोलवर प  का हवा. स्वातंत्र्य म्हणजे स्वैराचार नव्हे आणि ह  क हवेत तर कर्तव्येही आलीच! कवयित्री **आसावरी काकडे** म्हणतात –

*माझ्या भोवतीचे सगळे पहारे*



आई, तू अति कष्ट उपसले, दु:खाचे किती मूग गिळले। प्रारब्धाचे प्रहार झेलुनी, वादळवारे मनी साहिले।।

**जाणून घ्या...** ग्रंथ - रामायण, भाषा - पंजाबी, लिपी - गुरुमुखी देवनागरी, साहित्यप्रकार - काव्य



प्रायोजक – श्री. सुधीर विष्णू दफ्तरदार, पुणे

*त्यातील बंधनांसकट मला हवे आहेत!*
*फक्त एवढंच, त्या पहाऱ्यांवर माझा पहारा हवा!*
*मनमुक्त होऊन अवकाशात झेपावल्यावरही*
*गुरुत्वाकर्षण हवंच आहे, पाय टेकवण्यासाठी!*
*फक्त एवढंच, हवी ती उंची गाठता येईल,*
*एवढा पंखात जोर असावा.*

पंखात जोर येतो आरोग्यपूर्ण जीवनशैलीमुळे. उत्तम आहार, नियमित व्यायाम आणि जीवनदायी सवयी असल्या की उत्तम आरोग्य लाभतं. सोबत मैदानी खेळ, योगासनं, गड किल्ल्यांवरची भटकंती असेल तर सोन्याहून पिवळं. पंखात जोर यायला आणखीही गोष्टी लागतात- त्या म्हणजे उत्तम शिक्षण. शिक्षणातून मिळतो आत्मविश्वास, धैर्य आणि विवेकदृष्टी! शिक्षणासोबतच असायला हवा एखादा छंद - वाचनाचा, गायन-वादनाचा, नृत्यनाटकाचा... किंवा निसर्गप्रेमाचा, प्रवासाचा. छंद असावा माणसं जोडण्याचा, मैत्रीतून समाज आणि समाजातून देश जाणून घेण्याचा. बाळगावी कुठलीही आकांक्षा. जावे एखाद्या ध्येयामागे तन-मन-धन अर्पून. व्हावे वेडे चांगल्या गोष्टी साध्य करण्यासाठी. कवी **अरविंद भुजबळ** यांनी लिहिलंय-

*आकांक्षांचे काजळ आता, डोळ्यांमध्ये घालत जा*
*आपोआप वाट मिळेल, तू फक्त चालत जा...*

कवयित्री **शांताबाई शेळके**ही हाच आत्मविश्वास देतात शब्दांतून, नवा रस्ता फुटलेल्या वळणावर-

*प्रत्येक वेळी नवा रस्ता फुटतच असतो*
*फुटणार आहे, तसा रस्ता याही वळणावर*
*तिथेही असेलच दुतर्फा छाया, वर आभाळ*

(सोबतच्या लेखात ज्या कवींच्या कविता आलेल्या आहेत, त्यांचे काव्यसंग्रह संदर्भासाठी खाली दिले आहेत. लेखात आलेल्या कविता शोधा व त्या संग्रहातून पूर्ण करून 'छात्र प्रबोधन'कडे पाठवा.)

**संदर्भ** - १) सकिना - वसंत बापट २) तुझे गीत गाण्यासाठी- मंगेश पाडगावकर ३) उंच उंच झुला - अश्विनी गुरव ४) र तकमळांचे रान - शैला सायनकर ५) आरसा - आसावरी काकडे ६) ऊन-पाऊस झेलताना- अरविंद भुजबळ ७) अनोळख - शांता शेळके

*जरा थांबून श्वास फक्त घे छाती भरून...*

कवयित्री **अंजली कुलकर्णी** आपल्या 'सखी' या कवितेत ऋतूंच्या पायघड्यांवरून अलगद तरंगत जाताना भांबावून न जाता डौलात पुढे जायला सांगतात. आपल्या दुर्बल मैत्रिणींना हात देऊन मदत करण्याचा सल्लाही देतात. 'सखी' ही कविताच आता आपण पाहूयात.

### सखी

ऋतुंच्या पायघड्यांवरून
अलगद तरंगत जा अशीच
धु  यात पायऱ्या अदृश्य झाल्यातरी
भांबावू नकोस,
तुझ्या स्पर्शानेही लख्ख होत जाईल पाऊलवाट
गोंधळू नकोस

हातापायात, डो  यात फुलं माळ
नजरेतील चमक हरवू देवू नकोस,
थोडा घोळ उचलून धर वस्त्रांचा
अडखळू नकोस

तो शिरपेच खुशाल चढव मस्तकावर
स्वत:च स्वत:ची राणी हो
मात्र विसरू नकोस,
आसपासच्या सख्यांना
मदत कर त्यांना फुलं माळायला,
त्यांचे त्यांचे शिरपेच खोवायला.
हात दे डोंगरचढणीवर चढताना...
विसरू नकोस...


भोवतीचा गलका वाढतोय; वाढू दे
क्रोधाग्नि भडकतोय, भडकू दे,
धु  यातून सरळ सिंहासनापर्यंत
निर्भय चालत रहा...

**- अंजली कुलकर्णी**

काय मग मैत्रिणींनो, होणार ना निर्भय?

♣♣

**- आश्लेषा महाजन**
२३०, चित्ररेखा, सहकारनगर - १, पुणे 411009



# ही सविता... असाही सविता

**– बागेश्री पोंक्षे**

पडवीतली जागा पाहुण्यांसाठी खूप कमी पडायला लागली म्हणून तानामामा आणि त्याचा मुलगा घरातून उठले आणि घरासमोरचा रस्ता ओलांडून शंकराच्या मंदिरात येऊन बसले. हे नेहमीचेच झाले होते. शाळेतून आल्यावर पिशवीत विक्रीसाठी तयार केलेली खाद्य पदार्थांची पाकिटे, पापड, पापड्या कुरडया, लोणची, चिवडा, चकली असे सगळे घेऊन सविता दारोदार ते विकायला जाई आणि थेट रात्री परतत असे. परतल्यावर लगेचच लहान मुलांच्या शिकवण्या सुरू करी. दीड खणाच्या छोट्या घरात शिकवणीला मुले आली की तानामामा आणि त्यांच्या मुलांना बसायला जागा उरत नसे. अशावेळी ते लगोलग निघत आणि रस्ता ओलांडून समोरच्या देवळात जाऊन बसत असत.

तानामामासारख्या रेल्वेरुळावरून डबा घसरलेल्या गाडीसारखं जीवन असणाऱ्या माणसाच्या घरी सविताचा जन्म झाला, हे भांगेत तुळशीचं रोप उगवावं तसंच आळीतल्या सगळ्या लोकांना वाटत होतं. अर्थात सविताची आई अतिशय कर्तबगार बाई म्हणून सगळ्या पंचक्रोशीत माहिती होती. शिक्षण झाले नसल्याने आणि संधी मिळाली नाही म्हणून थोड्या मागे पडल्या; पण कष्ट करून स्वयंपाकातील वेगवेगळ्या गोष्टींच्या बळावर चार पैसे गाठीला लावायला पार्वतीबाईंनी सुरुवात केली. त्यांना दोन मुले आणि एक मुलगी. दीर-जाऊ, पुतण्या पै पाव्हणा, आला-गेला या सगळ्यांसाठी हसतमुखानं घराची दारं उघडी ठेवली.

पार्वतीबाईंनी सविताची हुशारी लहानपणापासूनच ओळखली होती. मोठ्या दोनही मुलांनी शिक्षणात रस न दाखवल्यामुळे निराश झालेल्या पार्वतीबाईंचं मन सविताने दाखवलेल्या हुशारीमुळे हरखून गेलं होतं. अत्यंत समजूतदार आणि जात्याच हुशार असलेल्या सविताकडे पाहून ती भावंडात सगळ्यात लहान आहे हे आवर्जून सांगावं लागत होतं.

महानगरपालिकेच्या शाळेत जाऊन पहिल्या क्रमांकाने पास झालेल्या सविताला गुरुजींनी स्वत: पैसे भरून त्या भागातल्या चांगल्या शाळेत दाखल केलं आणि छोटी सविता हळूहळू शाळेतल्या सगळ्यांच्या गळ्यातील ताईत बनली.

धुणं-भांडी करून घरातलं स्वयंपाकाचं बघायची जबाबदारी सातवी-आठवीतच परिस्थितीनं सवितावर टाकली. आईने बनवलेल्या पदार्थांची दारोदार विक्री करण्यासाठी आई सकाळीच बाहेर पडे आणि सवितावरच सगळे घर पडे! घरातलं आवरून चार घरची कामं, शिकवण्या करून, दारोदार जाऊन वस्तूही विकत. शिवाय दोन वर्षानं वडील असलेल्या भावाला अभ्यासात मदत करी. जेव्हा दहावीची परीक्षा तिने दिली, तेव्हा ती त्या उत्तम मानल्या जाणाऱ्या



सौंदर्याचा वेध आपुली साथसंगत सोडत नाही। चैतन्याच्या अंतापर्यंत भावबंधन तोडत नाही।।

**जाणून घ्या...** ग्रंथ - रामायण, भाषा - तमिळ, लिपी- तमिळ देवनागरी, साहित्यप्रकार - काव्य



**प्रायोजक – सौ. प्राची अमर परांजपे, सांगली.**



शाळेत प्रथम क्रमांकाने पास झाली.

तानामामाचं मन स्वत:ला खात होतं. व्यसनापायी कधीही शुद्धीवर नसलेल्या तानामामाने आयुष्यात कधीही घरखर्चासाठी काही कमावलं नव्हतं. तरीही पार्वतीबाईंनी त्यांना साधं टोचून बोलणंही केलं नव्हतं. सगळ्या संसाराचा गाडा त्या एकट्याच ओढत होत्या. आणि अशात सगळ्या शाळेत पहिल्या नंबरने पास झालेल्या सविताच्या चेहऱ्यावरचं हसू आणि हातातलं बक्षीस पाहून तानामामाचं मन हेलावलं होतं.

आपल्या बारावीच्या परीक्षेत अव्वल गुण मिळविलेल्या मुलीने डॉ टर बनण्यासाठी अर्ज केला तेव्हा तर तो मनातल्या मनात स्वत:ला कोसत राहिला. अधूनमधून शुद्धीवर राहून चार पैसे कमवू लागला आणि सविताला एखादी वस्तू तो स्वत:च्या पैशाने आणू लागला. तरीही जन्मभराची मैत्रीण असलेली दारू तानामामाचा कब्जा पुन्हा घ्यायची आणि हताश, दारूच्या हातचं खेळणं बनलेला तानामामा पुन्हा पहिले पाढे पंचावन्न म्हणून त्या दारूच्या पूर्ण आहारी गेलेला असायचा.

'स्व'-रूपवर्धिनीसारख्या चांगल्या संस्थेत आता सविता जायला लागली होती. स्वत:सारख्या अनेक आर्थिक - सामाजिकदृष्ट्या मागे पडलेल्या मुला-मुलींना शिकवत स्वत: डॉ टरीचे धडे घेत होती. पार्वतीबाईंनी तर उर फुटेपर्यंत स्वत:ला कामात गुंतवलं होतं. त्यांना लेकीच्या शिक्षणासाठी पैसे उभे करायचे होते नं...

ज्या शिक्षणाच्या अभावी स्वत:ची ओळखही समाजात आपण निर्माण करू शकलो नाही, अशी खंत पार्वतीबाईंना होती; त्याच गोष्टीपासून मुलीला लांब न ठेवण्याचा त्यांनी निर्धार केला होता. माय लेकींनी अत्यंत काटकसरीने आणि कष्टपूर्वक प्रयत्नातून काढलेला मार्ग हा आळीतल्या सगळ्या मुला-मुलींच्या पालकांसाठी आदर्श ठरला होता.

घरोघरी सविताचे उदाहरण आपापल्या मुलांना पालक देत. सविताच्या स्वत:च्या जगण्यातून तिची बनलेली स्वत:ची मतं आणि विचारांची एक लख्ख प्रकाश देणारी वीज तिच्या बोलण्यात-वागण्यात त्यांना जाणवे. विचार करण्याचं स्वातंत्र्य आणि ते प्रत्यक्षात आणण्याचं स्वातंत्र्य ज्या आर्थिक-सामाजिक गटात राहणाऱ्या लोकांना परवडत नाही, ते स्वातंत्र्य सविताने घेतलं होतं. ते पाहून आळीतले सगळेच थ क झाले होते. स्नेही आणि मित्रांकडून शिक्षणासाठी घेतलेलं सगळं बिनव्याजी कर्ज हे आपल्या कष्टातून परत करायचं, आईवर त्याचा जराही भार पडू द्यायचा नाही हे सवितानं ठरवलं होतं. ते करण्यासाठी अजून ४-५ वर्षांचा काळ जाऊ द्यावा लागणार होता.

'स्व-रूप वर्धिनी' मध्ये सवितानं जाणलं होतं की आपल्यासारखेच आर्थिक, सामाजिकदृष्ट्या मागे राहिलेले बरेच जण आजूबाजूला आहेत. ते सर्वजण स्वत:च्या प्रयत्नातून स्वत:ची ओळख तयार करण्याच्या मागे आहेत. त्यांच्याकडून आपण काही शिकू


नव्या युगाच्या प्रारब्धाची शपथ निरंतर घेऊ। भाळावरची अधोरेखिते आभाळाप्रत नेऊ।।

**जाणून घ्या...** ग्रंथ - रामायण, भाषा - तेलगू, लिपी- तेलगू देवनागरी, साहित्यप्रकार - काव्य

**प्रायोजक – डॉ. गीतांजली, डॉ. सिद्धार्थ पटवर्धन, ग्लास्गो, स्कॉटलंड.**

शकतो. प्रश्न आहेत, म्हणून रडत बसलो तर ते कधीच संपायचे नाहीत. आपण परिस्थितीच्या दुष्ट चक्रातून कधीच बाहेर यायचो नाही.

परिस्थितीला शरण जाणारे बनण्यापेक्षा परिस्थितीवर परिणाम करणारे बनण्यासाठी आपल्याला शिकायचे आहे. हे तिने मनाशी प के केले होते.

पुण्यासारख्या ठिकाणी डॉ टर होऊन वैद्यकीय सेवा सल्ला दिला, तर लगेचच माझ्यावर झालेली कर्जे मी फेडू शकेनच. त्यापुढे माझ्या घरातील कोणालाही कर्ज घ्यावे लागणार नाही इतके पैसे मी स्वकमाईतून उभे करू शकेन; पण 'स्व'रूपवर्धिनीने असे अल्पसंतुष्ट, संकुचित होण्यापासून आपल्याला वाचवले आहे, हे ती जाणून होती.

भारताच्या उत्तर पूर्वेकडील टोकाला असणाऱ्या पूर्वांचलाकडून येणारी हाक सविताच्या कानावर आली आणि डॉ टर झालेली सविता अत्यंत दुर्गम भागातल्या आदिवासी मित्र-मैत्रिणींना आपली वैद्यकीय सेवा देण्यासाठी पुण्यातल्या तिच्या घरापासून शेकडो कि.मी. दूरवर असणाऱ्या अरुणाचलात राहायला गेली.

पायी हिंडून पाठीवरच्या सॅकमध्ये डॉ टरची सर्व आयुधे घेऊन सविता गावो-गावी हिंडली. ५ वर्षे अरुणाचलातील आपल्या मित्रांसाठी आपले गाव सोडून ती राहिली.

गाडीने रस्ता सोडला की जंगलातून गावापर्यंत चालत जायचे. घराघरांमध्ये फिरून रोगी पाहायचे. हिमालयीन डोंगरातले चुनखडकाचे रस्ते खचून दरी तयार झाली असेल तर पाण्यातून - चिखलातून त्या गावापर्यंतचा रस्ता पार करायचा आणि सगळ्यांना तपासायचे. जंगलातील अस्वलांनी ज्यांच्या डो यावरचे केस आणि त्याखालची सगळी त्वचाच हाताने उपटून टाकलीय, त्यांना ४-४ महिने औषधपाणी करून त्यांचे डोके शिवायचे, ज्याच्या डोळ्यांना अस्वलांच्या बरोबर झालेल्या झटापटीत जखमा झाल्यात, नव्हे ते खोबणीबाहेर आलेत त्यांच्यावर उपचार करायचे. ज्यांची मातृभाषा आपल्याला येत नाही, त्यांनी अनाकलनीय भाषेत वर्णन केलेल्या रोगांच्या लक्षणानुसार त्यांना औषधे द्यायची. पायपीट करून घरी पोहोचल्यावर भात शिजवून खायचा आणि झोपायचं. कोणी अचानक रात्री उपचारांसाठी उठवले नाही तर ५ तास झोपायचे आणि पुन्हा उठून परत कामाला लागायचे.

या सर्व कामात सविता शिकून तयार झाली. ज्यांच्यापर्यंत व्यवस्था आणि विकास पोहोचला नाही. त्यांच्यापर्यंत पोहोचण्याचा आणि त्यांच्यासाठीच काम करण्याचा तिचा विचार ह्याच काळात प का होत गेला. काम करून पाहिले की प के होते. 'कमी गरजांमध्ये, कमी पैशांमध्ये राहायचे ठरवले तर तसे राहता येते...' या विचाराचा प्रयोग



करून पाहायची ती प्रयोगशाळा होती. तिचे बालपणही अशाच पैशांच्या आणि समाजमान्यतेच्या अभावातच गेले होते; पण तेव्हा ती समाजमान्यता आणि पैसा दोन्हीही मिळवू शकण्याच्या टप्प्यात नव्हती. आज ती ते दोन्हीही मिळवू शकत असताना, ते 'न' मिळवण्याचा तिचा निश्चय झाला होता.

आज कोकणात कणकवलीजवळ तळेरे येथे वनवासी आणि सर्व जनवासी अशा सर्वांसाठीच तिचे अद्ययावत रुग्णालय आहे. स्त्रीरोग व प्रसूती शास्त्रातील एम.डी. पदवी मिळवून ती योग्य मोबदल्यात तिची सेवा उपलब्ध करून देत आहे. तिचे यजमानही डॉ टर आहेत. स्वत:च्या कुटुंबाचा परीघ समाजापर्यंत वाढवत नेऊन सगळ्यांनाच त्या परिघात घेण्याची इच्छा असणारे आणि तसे वागणारे सासर तिला मिळालंय. अनेक मुलींना शिक्षणापासून वंचित होण्याचे वाचवत त्यांना आधार देत आणि अनेकींना रोजगाराची संधी देत कोणताही गाजावजा न करता हा आपला 'सविता' (सूर्य) काम करीत आहे.

♣♣

**- बागेश्री पोंक्षे**

स्त्री श ती प्रबोधन,
ग्रामविकसन, पुणे - ३०



**दूर दऱ्याखोऱ्यात निळं तळं थरारलं। गार झुळूक बोचरी मन अमृतात न्हालं।।**

**जाणून घ्या...** ग्रंथ - रामायण, भाषा - उडिया, लिपी- उडिया, देवनागरी, साहित्यप्रकार - काव्य, कथा



**प्रायोजक - श्री. अजित विद्याधर परांजपे, अमेरिका.**

## छात्र प्रबोधनतर्फे नावीन्यपूर्ण राज्यस्तरीय सांघिक स्पर्धा : २०१३-१४

दिवाळीच्या सुट्टीचा या स्पर्धांच्या पूर्वतयारीसाठी पुरेपूर वापर करता यावा म्हणून महिनाभर अगोदरच स्पर्धांचे नियोजन जाहीर करत आहोत. एकाच शाळेतील, अथवा वेगवेगळ्या शाळांतील मित्रमैत्रिणींचा गट करून मोठ्या संख्येने या स्पर्धांमध्ये सहभागी व्हा. तुमच्यातल्या कल्पकतेला व विविध कलागुणांना व्य त होण्याची संधी द्या.

**इ. ७ वी ते १० वीच्या विद्यार्थ्यांसाठी असून त्यांना कोणतेही शुल्क नाही. सर्व स्पर्धा सांघिक आहेत.**

※ **'माझा गाव / शहर' याविषयावर स्लाईड शो (पी. पी. टी.) निर्मिती स्पर्धा** (३ जणांचा गट)

तुमच्या गावाचा इतिहास, भूगोल, निसर्ग, माणसे, संस्था, लोकजीवन, दर्शनीय स्थळे, व्यवसाय यापैकी एक वा अनेक वैशिष्ट्यपूर्ण गोष्टी दाखविणारा तुमच्या गावाचा/शहराचा स्लाईड शो तयार करण्याची स्पर्धा

**स्पर्धेचे तपशील –** ● स्लाईडस्‌ची संख्या २५ ते ३० असावी. ● स्लाईडस्‌ मराठीतून असाव्यात. त्यासाठी युनिकोड मराठी फॉण्टचा वापर करावा. ● श य तेथे स्लाईडस्‌ला फोटो, आवाज, व्हिडिओ लीप्सची जोड द्यावी.
● स्लाईडसाठी जे जे संदर्भ वापरले असतील (ज्यांची मदत घेतली असेल, पुस्तके, वेबसाईटस्‌, व्य ती इ.) त्यांची नावे शेवटच्या स्लाईडस्‌मध्ये लिहावीत. ● विषयाची निवड, स्लाईडस्‌ची गुणवत्ता, गावाचे वैशिष्ट्य दाखवणारे पैलू, वापरलेले संदर्भ, एकत्रित परिणाम व मांडणी यांद्वारे गुणांकन केले जाईल.

**बक्षिसे – प्रथम : रु. ५००/–, द्वितीय : रु. ४००/–, तृतीय : रु. ३००/–**

※ **भारतीय भाषांमधील स्फुर्तिगीत समूह गायन स्पर्धा.** (५ ते ७ जणांचा गट)

**स्पर्धेचे तपशील –** ● आपल्या नोटेवर छापलेल्या मराठी, हिंदी, संस्कृत सोडून अन्य कोणत्याही भाषांमधील राष्ट्रभ तीपर स्फुर्तिगीत असावे. ● स्फुर्तिगीत देवनागरी लिपीत लिहून त्याचा मराठी शब्दार्थ/भावार्थ/ रसग्रहण लिहायचा आहे. ● गटाने ते गाऊन त्याचे व्हिडिओ रेकॉर्डिंग करावे व त्याची सीडी तयार करावी. ● लेखन, गायन मुलामुलींचे असावे. (साथ संगत मोठ्यांची चालेल.) ● साभिनय गीत सादर केल्यास १० गुण जास्तीचे मिळतील.
● गीताची निवड, त्याचा अर्थ व रसग्रहण, गायन व सादरीकरण यांच्या आधारे गुणांकन केले जाईल.

**बक्षिसे – प्रथम : रु. ८००/– द्वितीय : रु. ७००/– तृतीय : रु. ५००/–**

※ **'तुम्हीच संपादक व्हा' हस्तलिखित स्पर्धा** ( ५ ते ८ जणांचा गट )

**स्पर्धेचे तपशील –**● हस्तलिखित ५० पृष्ठसंख्येचे असावे व ते दोन भागात करायचे आहे. ● एक भाग २५ पानांचा कोणत्याही एका विषयावर लिहिलेला असावा. ठरविलेल्या विषयावरचे विविध पैलू उलगडणारा असावा. विविध लेखन प्रकारांचे मिश्रण असणारा हा भाग असावा. ● दुसरा भाग २५ पानांचा संमिश्र असावा. त्याला कोणत्याही विषयाचे बंधन नाही. वैविध्यपूर्ण विषय व लेखन प्रकार यात असावेत. **दोन्हीपैकी कोणत्याही एका भागामध्ये खालील गोष्टींचा समावेश असावा.**

**१. एकांकिका, २. वर्षविशेष –** कवयित्री इंदिरा संत यांच्या जन्मशताब्दी निमित्त त्यांच्या पाठ्यपुस्तकाबाहेरचे कोणत्याही एका कवितेचे रसग्रहण **३. मुलाखत –** आपल्या परिसरातील एका प्रशासकीय अधिकाऱ्याची मुलाखत.
**४. प्रतिभाशाली लेखन –** कोणत्याही एका विषयावर १० × १० चे शब्दकोडे.
**५. कल्पक विचार –** नित्य वापरातील कोणत्याही एका वस्तूचे ५० उपयोग.

**बक्षिसे – प्रथम : १,०००/–, द्वितीय : ८००/–, तृतीय : रु. ६००/–, उत्तेजनार्थ : रु. ४००/–**

सर्व स्पर्धांची नोंदणी छात्र प्रबोधनच्या ईमेलवर अथवा पत्राद्वारे **दि. ३१ डिसेंबर २०१३** पूर्वी करणे आवश्यक
अधिक तपशीलासाठी मुख्य कार्यालयाशी संपर्क साधा.

**विशेष संधी –** क्रमांक प्राप्त हस्तलिखितात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांना परस्पर सोयीनुसार कोणत्याही महिन्यातील ४ दिवस 'छात्र प्रबोधन' अंकाच्या संपादकीय कामाचा अनुभव घेण्याची संधी मिळेल. पहिल्या तीन क्रमांकांना पुस्तके/ सीडी रूपाने बक्षिसे दिली जातील. विशेष गुणवत्ता प्राप्त सर्वांना प्रशस्तिपत्रके!

**सर्व स्पर्धांसाठीचे साहित्य पाठविण्याचा अंतिम दिनांक ३१ जानेवारी २०१४**

**मला वाटते वेलीवरचे, व्हावे सुंदर फूल। सुगंध उधळीत ज्याला त्याला, पाडावी मी भूल।।**

**जाणून घ्या...** ग्रंथ - रामायण, भाषा - उर्दू, लिपी - उर्दू, साहित्यप्रकार - काव्य, कादंबरी, निबंध

**प्रायोजक – डॉ. संतोष काकडे, बंगळुरू.**

# 'देतो तो देव...'

– महेश केळुसकर

शिवरामपल्लीला सर्वोदय संमेलन भरणार होतं. भारताला स्वातंत्र्य मिळून फ त ४ वर्षं झाली होती. शिवरामपल्लीला जाण्यासाठी गांधीजींचा एक शिष्य सेवाग्रामहून पायीच निघाला होता. त्याची शरीरयष्टी किरकोळ होती. अंगावर फ त एक नेसूचा स्वच्छ पंचा. दाढी वाढलेली होती. नजरेत तेज होतं आणि चाल तरतरीत होती. संमेलन संपलं. त्याला वाटलं, ज्यासाठी आपण आलो होतो ती गोष्ट संमेलनातून मिळालेलीच नाही. तो 'प्रकाश' कुठं आहे, ज्याच्या आपण शोधात आहोत. तो प्रकाश जरूर कुठेतरी आहे, हे त्याला माहीत होतं; पण तो त्याला दिसत नव्हता.
शिवरामपल्लीहून तो किरकोळ यष्टीचा माणूस पुन्हा पायीच पुढे निघाला. पोचमपल्लीत पोहोचला. तिथल्या हरिजनबांधवांनी या सर्वोदयीला विचारलं, ''आमची खपाटीला गेलेली पोटं तुम्हांला दिसतायंत का?'' सर्वोदयीने होय म्हणून मान हलवली. ते दलित पुढं म्हणाले, ''आम्ही खूप गरीब आहोत. बेकार आहोत.'' तेव्हा तो सर्वोदयी थोड्याशा बेफिकिरीने म्हणाला, ''मग काम करा. मेहनत करा. म्हणजे मग गरिबी दूर होईल.'' ती मंडळी शांतपणे म्हणाली, ''विनोबाजी, आम्ही काम करायला तयार आहोत. पण इथे या गावात कुठला कारखाना नाही की उद्योग. आम्हाला कुणी थोडी जमीन दिल्यास, आम्ही पोट भरू शकू.''

आता एवढ्या माणसांना फुकटची जमीन कोण देणार? एकेक इंच जमिनीसाठी किती भांडणं, किती झगडे, कोर्ट-कचेऱ्या नि मारामाऱ्या होत असतात. आणि हे दलित म्हणताहेत की आम्हाला कुणी थोडी जमीन दिली तर.. महाभारतात कौरवांनी पांडवांना सांगितलं होतं, 'सुईच्या अग्रावर राहील एवढीसुद्धा जमीन तुम्हाला मिळणार नाही.' अन् हे लोक जमीन मागताहेत! काय वेड लागलंय की काय यांना, विनोबाजी मनातल्या मनात म्हणाले. पण थोडा वेळ गेल्यावर एक सद्‌गृहस्थ पुढे झाले आणि म्हणाले, ''विनोबाजी, मी देतो यांना १०० एकर जमीन. अगदी एकही पैसा नको मला या जमिनीचा. यांना कष्ट करू देत. धान्य पिकवू देत. जगू देत.''

''ईश्वरा, तूच या सद्‌गृहस्थाच्या मुखातून बोलतो आहेस...'' विनोबा मनात म्हणाले. त्यांची झोप उडाली. विचारचक्र सुरू झालं. 'मला जर भारतात सर्व भूमिहीनांसाठी जमीन मागावयाची असेल तर एकूण पाच कोटी एकर जमीन पाहिजे. एवढी जमीन मागितल्यानं मिळेल? कोण देईल एवढी जमीन? तीही विनामूल्य? देवा, पोचमपल्लीच्या दलितांसाठी त्या सद्‌गृहस्थाला दान करण्याची चांगली बुद्धी देऊन तू आपलं अस्तित्व दाखवलंस. पण असे आणखी हजारो गरीब कष्टकरी आहेत या देशात. ते मर मर राबतात





लाटा अनंत कोटी, त्या ज्ञान सागराच्या। क्षितिजा पल्याड वाटा, कर्तृत्व संपदेच्या।।

**जाणून घ्या...** ग्रंथ - रामायण, भाषा - राजस्थानी, लिपी- देवनागरी, साहित्यप्रकार - काव्य, कथा, निबंध



प्रायोजक – सौ. मंजुषा सावर्डेकर, पुणे.

**विनोबांचा जन्म ११ सप्टेंबर १८९५ साली रायगड जिल्ह्यात गागोदे या खेड्यात झाला. महात्माजींच्या विचारांचा त्यांच्यावर पगडा होता. सर्वोदय चळवळीचे ते जनक. त्यांना 'भारतरत्न' हा सर्वोच्च सन्मान मिळाला. त्यांनी हजारो भूमिहीनांना जमिनी मिळवून देण्यासाठी 'भूदान चळवळ' सुरू केली. पण लहानपणी नकळत झालेले संस्कार त्यांच्या स्वभावात कसे मुरले होते, हे दर्शविणारे काही प्रसंग वाचूया सोबतच्या लेखातून...**

बड्या जमीनदारांच्या जमिनीत, पण त्यांना काय मिळतं? अर्धपोटी झोपतात बिचारे. पिळवणुकीला शरण जातात. त्यांना थोडी थोडी जमीन मिळाली तर किती चांगलं होईल ! त्या सद्‌गृहस्थासारखे आणखी काही हजार जमीनदार धावून येतील का भूमिहीनांच्या मदतीसाठी?'

सारखे प्रश्न आणि प्रश्न. विचार करून मेंदूला थकवा आला. पहाटे पहाटे विनोबांचा डोळा लागला. बाहेर थंड हवा सुटली होती. त्या हवेच्या झोताबरोबर जात्यावर दळण्याचा आवाज दूरवरून ऐकू येऊ लागला. थेट गागोदे गावातला... कुठं तामिळनाडूतलं पोचमपल्ली गाव नि कुठं महाराष्ट्रातल्या रायगड जिल्ह्यातलं गागोदे गाव! किती प्रचंड अंतर. पण पोचमपल्ली गावात गागोदे गावातून एकामागून एक सुरेल ओव्या ऐकू येऊ लागल्या.

हवेत पवित्र सुगंध दरवळू लागला. विनोबांना स्वप्न पडू लागलं. ५५ वर्षे वयाचे विनोबा एकदम ८-९ वर्षांचे लहान झाले आणि त्या आठवणीत रममाण झाले. *गागोद्यातल्या घराच्या ओटीवर बसून अंगणातल्या फणसांचा मधुर वास घमघमू लागला. आता हे सगळे फणस आपल्याला मटकवायला मिळणार... गोड गोड गरे... किती मज्जा.. असा तो तंद्रीत असतानाच आतून आईची हाक आली.*

*''विन्या, काय करतोयस रे?''*

*''आई, फणस बघ किती लागलेत झाडाला. मला दे ना गरे. खायचेत मला खूप.''*

*''अरे पहिल्यांदा शेजाऱ्यांना नेऊन दे. मग तुला देते.''*

*''का गं? आपल्या फणसाचे गरे आपण नाही पहिल्यांदा खायचे? शेजाऱ्यांना का म्हणून पहिल्यांदा?''*

*''विन्या, पहिल्यांदा देऊन नंतरच खायचं असतं. लक्षात ठेव, 'देतो तो देव आणि राखतो तो राक्षस.'''*

विनोबांना स्वप्नात आता तो दानशूर जमीनदार दिसू लागला. ''विनोबाजी, मी देतो यांना शंभर एकर जमीन,'' असं हसत हसत म्हणणारा. अशी आणखी काही माणसं येतील का पुढे भूदान करण्यासाठी? स्वप्नातच पुन्हा विचारचक्र सुरू झालं आणि पुन्हा एकदा गागोद्याच्या घरात हसतमुखानं वावरणारी आई दिसू लागली.

*विन्याची आई परमभक्त होती. घरात सर्वांना जेवायला घालून, घरातली सर्व कामं आटोपून स्वत:च दोन्ही कान पकडून म्हणत असे, ''हे अनंत कोटी ब्रह्मांडनायका, माझे अपराध क्षमा कर !'' आणि त्यावेळी तिच्या डोळ्यांतून अखंड अश्रुधारा वाहू लागत. तिचं हृदय भक्तीने परिपूर्ण होतं. तिची आपल्या कामावर ईश्वरावर असते तशीच श्रद्धा होती. स्वत:मधली आसक्ती कमी कमी करून कधीतरी पूर्ण नष्ट करावी आणि आपण 'जे जे भेटे भूत ते ते मानिजे भगवंत', असा अनुभव घेऊन आत्मा शुद्ध करावा, असा तिचा प्रयत्न असायचा.*

*विनोबांना आठवलं, शेजाऱ्या पाजाऱ्यांकडे कोणी बाई आजारी असल्यास तिच्या घरी जाऊन आई स्वयंपाक बनवून देई. पण नेहमी स्वत:च्या घरातला स्वयंपाक आधी बनवून मग गरज असलेल्या घरातला स्वयंपाक बनवायला जाई. एकदा विनूने आपल्या आईला पेचात पकडावं म्हणून तिला विचारलं,*

*''आई, तू मोठी स्वार्थी आहेस गं. पहिल्यांदा स्वत:च्या घरचा विचार करतेस आणि मग दुसऱ्यांकडे स्वयंपाक करून द्यायला जातेस.'' तेव्हा ती हसू लागली आणि म्हणाली, ''विन्या, त्यांना गरम खायला मिळावं म्हणून तिथं नंतर जाते आणि स्वयंपाक बनवते. हा स्वार्थ नव्हे बाळा,*



ध्येयभाव जो मनात, कृतीत तुझ्या येऊ दे। कार्याची कीर्तीध्वजा, दूरदेशी फडकू दे।।



**जाणून घ्या...** ग्रंथ - रामायण, भाषा - सिंधी, लिपी- देवनागरी, साहित्यप्रकार - काव्य

**प्रायोजक - श्री. शंतनू पटवर्धन, इलिनॉइस, अमेरिका.**

*परमार्थ आहे.''*

स्वप्न संपलं. बाहेर झाडावर पक्ष्यांची किलबिल चालली होती. पहाट होत होती. इतके दिवस ज्या प्रकाशाच्या शोधात विनोबा होते, तो अंतरंगातला प्रकाश बाहेर पसरला होता. कुणीतरी आतून त्यांना आवाज देत होतं, प्रश्न विचारत होतं आणि उत्तरही देत होतं. विनोबा, तुझा अहिंसेवर विश्वास आहे की नाही? कुणाला घाबरतोस तू? कुणावर अविश्वास ठेवतोस? तसं केलंस तर तुझा अहिंसेवर वगैरे जो विश्वास आहे, तो तुला सोडावा लागेल. म्हणून श्रद्धा ठेव आणि मागत राहा. ज्यांच्याकडे खूप काही आहे, त्यांच्याकडे मागत रहा आणि ते मिळालेलं, ज्यांच्याकडे काही नाही त्यांना वाटत राहा. चालत राहा... अखंड चालत राहा...

आणि तो ५५ वर्षांचा किरकोळ अंगाचा माणूस चालू लागला. ते साल होतं १९५१. विनोबांना मनापासून वाटलं की, 'चालत राहा आणि भूमिहीनांसाठी जमीन मागत राहा' ईश्वराचाच हा आदेश आहे. आणि वय झालेलं असूनही त्यांना थकवा जाणवेना. आपल्याला कुणीतरी हलवतोय, जागं करतोय आणि आपल्या मागोमाग ओढून नेतोय, अशी त्यांची भावना झाली.

सुरुवातीला विनोबा अत्यंत कठोर हृदयी होते. अगदी घट्ट मनाचा माणूस म्हणूनच लोक त्यांना ओळखायचे. पण मग असं काय घडलं की त्यांचं हृदय लहान-सहान गोष्टींनीही पाझरू लागलं. मन हळवं झालं आणि पवित्र अनुभवांनी बुद्धी चिंब होऊ लागली? एकच कारण होतं, **भूदान.**

१९६४ पर्यंत सतत १३ वर्षे गांधीजींचा तो पट्ट शिष्य चालत होता. जंगलांमधून, दऱ्याखोऱ्यांतून, अवघड वाटांवरून आणि धुळीच्या रस्त्यांवरून... 'जमीन' मागत फिरत होता आणि आश्चर्याची गोष्ट म्हणजे त्यांनी जमीन मागितल्यावर ती देणारेही पुढे येत होते. त्या १३ वर्षांत सुमारे ४२ लाख एकर जमीन विनोबांनी 'भूदान' चळवळीतून मिळवली. त्यानंतर असा चमत्कार आजतागायत भारतात झाला नाही.

♣♣

**- डॉ. महेश केळूसकर**
२०३-रामेश्वर, धोबी आळी,
मुंदडा कंपाऊंड, ठाणे (प.) 400601

करून तर पाहा...

## उडणारी परी



पुस्तकात गोष्टींमध्ये भेटणारी परी तुमचे आकर्षणच असते. आज आपण ती परी स्वत: करायला शिकणार आहोत. चला तर मग...

साधा सोपा परीचा आकार जाड कागदावर काढून घ्या. जुन्या लग्नपत्रिकांचा पेपर यासाठी छान दिसेल. व्यवस्थित सफाईने हा आकार कापून घ्या. त्याला सजवा, रंगवा. त्यासाठी तुम्हाला ऑईलपेस्टलस् वापरायला आवडतील. परीचे पंख पांढऱ्या किंवा फि या रंगाने पारदर्शक दाखवा, म्हणजे फ त रेषांचाच वापर करा. त्याच्या मागील बाजूस एक छोटासा स्ट्रॉचा तुकडा सेलोटेपने आडवा, प का चिकटवा. त्या स्ट्रॉमधून दोन लांब लोकरीचे धागे ओवून घ्या. भिंतीवरच्या खिळ्यावर किंवा तुमच्या मित्र-मैत्रिणींच्या हातात त्याचे दुसरे टोक अन् तुमच्या हातात त्याचे एक टोक असू द्या. मग त्या लोकरीच्या दोन धाग्यांना तुमच्या हातातून विलग करा, म्हणजे परी उडू लागेल. ही उडणारी परी म्हणजे धम्माल. तुमच्या छोट्या भावंडांना भेट म्हणून द्यायला तुम्हाला न की आवडेल हो नं?

**- शुभा रुद्र,** 'गोपिका', प्लॉट नं. ७, एल. आय. सी. कॉलनी, पुणे-सातारा रस्ता, पुणे ९

प्रयत्नांची करिता शिकस्त सगळा अंधार तो लोपतो। रस्ता सर्व प्रकाशयु त बनुनी उत्साह संवर्धितो ।।

**जाणून घ्या...** ग्रंथ - रामायण, भाषा - चिनी, लिपी - चिनी, साहित्यप्रकार - काव्य

प्रायोजक - मे. सी. व्ही. कांड कन्सलटन्टस् प्रा. लि., पुणे.

# कागदाचे हेलिकॉप्टर


साध्या वहीचा किंवा कॉम्प्युटर प्रिंटआउटचा वाया गेलेला एखादा कागद घ्या. त्याचा १५ सेंमी. × ४.५ सेंमी. भाग कापून घ्या. या कागदाच्या लांबी व रुंदीकडील मध्यरेषा काढून त्यावर १ आकृती प्रमाणे C, D आणि E, F हे बिंदू मिळवा. C, D रेषेच्या अलिकडे १.५ सेंमी. अंतरावर A आणि B हे बिंदू आहेत. आता $AA_1$ व $BB_1$ या रेषा काढा. या रेषांची लांबी कागदाच्या रुंदीच्या एक चतुर्थांश आहे.

- $AA_1$ , $BB_1$ आणि E F कात्रीने कापून घ्या.
- आता आकृती २ प्रमाणे तुटक रेषांवर घडी घाला. खालच्या बाजूच्या पट्ट्या मध्यरेषेपर्यंत जुळतील अशा दुमडा. ही झाली आपल्या हेलिकॉप्टरची शेपटी.
- वरच्या दोन पट्ट्या हे हेलिकॉप्टरचे पंख आहेत. CGEF आणि DHFE या पट्ट्या C, D रेषेवर पण एकमेकांविरुद्ध दिशेने ९०° अंशात दुमडा.
- आता आकृती ३ प्रमाणे हेलिकॉप्टरचा आकार तयार होईल. शेपटाचा शेवटचा भाग २-३ मि.मि.वर दुमडा. आता वरील दोन पैकी एका पंखाला धरून ७ ते ८ फुटावरून अलगद सोडून दिल्यास आकर्षक गिरकी घेत घेत हेलिकॉप्टर खाली येते.


प्रयोग म्हणून वेगळ्या कागदापासून शेपूट लांब करून पाहा. आणखी एका प्रकारात पंख मोठे करून पाहा. जरा जाडसर कागद घेऊन हे केल्यास कसे उडते तेही पाहा. कशाचा काय परिणाम होतो याची नोंद ठेवा.

आपली प्रतिक्रिया मला अवश्य कळवा.


आकृती १




आकृती ३




आकृती २




– श्रीरंग गोखले
२७/४३, नवसह्याद्री, पुणे 411052
skg2743@gmail.com



स्वप्ने पेरून कणाकणांत, फुलवूया ध्येयाचे मळे। स्वप्नाला आणून सत्यात, दूर करू अंधाराचे जाळे।।



**जाणून घ्या...** ग्रंथ - रामायण,भाषा - इंग्लिश, लिपी - इंग्लिश रोमन, साहित्यप्रकार - निबंध कथा काव्य

प्रायोजक – श्री. राजेश शंकर शेलार, पुणे.

लेखांक – (अंतिम) ९

# होय, निर्णय माझा आहे !




– वाच. वनिता पटवर्धन

मैत्रिणींनो आणि मित्रांनो, गेले वर्षभर 'निर्णयातील स्वावलंबन' ही लेखमाला तुम्ही वाचलीत. त्यातील काय काय रुचले आणि पचले? त्यातील माहिती, उदाहरणे, सूत्रे, विचार यांचा अंगीकार कुठे कुठे केलात? त्यामध्ये कोणकोणत्या अडचणी आल्या? मला विश्वास वाटतो की '**होय, निर्णय माझा आहे!**' असं तुम्ही अनेकदा म्हणत असाल. कदाचित प्रत्येक लेखाचा बारकाईने विचार केला नसेल, पण स्वत:चा निर्णय घेण्यातलं स्वावलंबन न कीच जोपासलं असेल तुम्ही. हो ना?

निर्णय घेण्याच्या या वाटेवर आपल्याला अनेक प्रश्नांची उत्तरे मिळाली. निर्णय म्हणजे काय? ही एक प्रवाही विचार प्रक्रिया आहे. निर्णय घेताना आपण एखादा पेच सोडवतो आणि अनेक पर्यायांमधून एखाद्याची निवड करतो. असे निर्णय तर आपण सततच घेत असतो. मात्र आपणच ते घेतो का? हा खरा प्रश्न आहे. काही वेळा परावलंबन अपरिहार्य असते. अभ्यासक्रम, परीक्षा पद्धत, कोणती शाळा, सणवार अशा अनेक बाबतीत आपण निर्णय नाही घेऊ शकत. मात्र अभ्यास, प्रकल्प, सहली, कपडे, खाणेपिणे, मित्र-मैत्रिणी, सवयी यांविषयी तर ठरवता येतं की नाही? की त्याही बाबतीत इतर कुणी ठरवतं? काय करता तुम्ही? कुणाचे अनुकरण करणं, निर्णय घेणं, टाळणं, देव किंवा दैव यांवर हवाला टाकणं हे नाही ना होत? 'मी निर्णयकर्ती/कर्ता आहे' ही वाटचाल स्वावलंबनाच्या दिशेने आहे.

तुम्ही अनुभवलं असेल की ही वाटचाल अगदी काही सोपी नाही. नुसतं म्हटल्याने निर्णय घेणं आणि तेही अचूक, फायदेशीर हे लगेच जमेल असं नाही. कोणकोणते अडथळे आहेत या वाटेवर? ते स्वत:विषयीच आहेत. वरवरचा विचार, स्वत:ची मते नसणे, आळस, स्वत:चा स्वभाव आणि आवड-निवड यांची नीट जाण नसणे, जोखीम घेण्याचे धाडस नसल्यामुळे परावलंबन बरे वाटणे, सोय-गैरसोय तोलता न येणे, उतावळेपणा, धरसोडवृत्ती, कुणाचा तरी प्रभाव असे कितीतरी अडथळे उभे राहातात. मात्र 'माझा निर्णय मी घेईन' असा निश्चय तडीस नेताना हे अडथळे पार करता येतात. स्वतंत्रपणे विचार करणे, धीटपणा, स्वत:च्या क्षमतांची जाणीव, चिकाटी, सारासार विचार यांमुळे पुढे जाता येते. म्हणजे कुणाच्या प्रभावापेक्षा स्वभावात भीस्त हवी ! प्रसंगी स्वत:मध्ये बदल करत निर्णयाशी बांधिलकी राखायला हवी.

असे स्वत:च निर्णय घेताना महत्त्वाचे कोणकोणते टप्पे आहेत? प्रथम पेचप्रसंग किंवा निर्णयविषय पूर्णपणे समजून घ्यायचा. मग अनेक पर्याय किंवा मार्ग यांचा शोध घ्यायचा. पर्यायांमधून निवड करण्यासाठी स्वत:ची वैशिष्ट्ये, ध्येये यांच्या आधारे निकष ठरवायचे आणि निर्णय घ्यायचा !

असे टप्पे गाठले, तरीही आपल्याला माहीत आहे की कोणताही निर्णय कधी १००% योग्य नसतो. मात्र आपण अशा शास्त्रशुद्ध पद्धतीने जाताना ही ट केवारी वाढवित नेतो. आपल्या निर्णयाचा परिणाम किती काळ, कोणाकोणावर आणि कसकसा होणार म्हणजेच निर्णयाची व्याप्ती किती आहे, त्यावर या निर्णय प्रक्रियेचा सोपा-अवघडपणा अवलंबून असतो. 'वाढदिवसानिमित्त खरेदी करायचा पोषाख निवडणे' आणि 'कोणत्या महाविद्यालयाची निवड करू' ते ठरवणे यांची व्याप्ती खूप कमी-जास्त आहे, हे तुमच्या लक्षात येईल. शिक्षण, नोकरी, विवाह, छंद, समाजसेवा यांविषयीचे आपले निर्णय तर संपूर्ण आयुष्य घडवत असतात. हो, आणि हे लक्षात आहे ना की धूम्रपान, गर्द, मद्यपान, निष्काळजीपणे वाहन चालवणे अशा वाईट सवयींचे आकर्षण सामोरे आले की ठामपणे 'नाही' म्हणायचे.

वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये निर्णय घेताना या प्रक्रियेच्या अनेकविध छटा स्पष्ट होतात. क्रीडा क्षेत्रामध्ये वैयि तक किंवा सामूहिक सामने खेळताना काही निर्णय पूर्वनियोजित




एकेक किरण तेजाचा, जमवीत मी निघालो। अंधार जरी थोडासा, उजळीत मी निघालो।।

**जाणून घ्या...** ग्रंथ - रामायण, भाषा - फारसी, लिपी - उर्दु, साहित्यप्रकार - काव्य



प्रायोजक – स्टॅटफिल्ड इ विपमेंट, पिरंगुट, पुणे.



असतात, तर काही आयत्यावेळी क्षणार्धात घ्यावे लागतात. अटीतटीच्या सामन्यातले सावधपणे, जबाबदारीने, अनुभवाधारित निर्णय विजय खेचून आणतात. उद्योजकतेच्या वाटेवरचे निर्णय सखोल अभ्यास, नावीन्य, जिद्द, परस्परविश्वास आणि लवचिकतेमुळे प्रगतीकडे नेतात. गटामध्ये निर्णय घेताना तर अडथळे गुणाकाराने वाढतात ! गटातील सदस्यांची संख्या जितकी जास्त तितकी मत-मतांतरे, विचारपद्धती वेगवेगळ्या ! मग काय करायचे? योग्य रितीने गटचर्चा करायची आणि निर्णय प्रक्रियेचा एकेक टप्पा गाठायचा. प्रतिकूल गोष्टींचा आधीच मागोवा घेऊन पर्यायी नियोजन केलं तर वाटतं त्यापेक्षा ध के कमी बसणार हे न की !

अशाप्रकारे निर्णय वाटेवरून चालताना निर्णय चुकणे श यच नाही. हां, कधी थोडेफार इकडे-तिकडे होईल, पण निर्णय योग्यच असेल. काय म्हणता? कधी निर्णय सपशेल चुकतो?

हो, खरं आहे. कधी सुयोग्य निर्णय घेण्यात अपयश येतं. फायदा आणि सोय यांपेक्षा तोटा आणि गैरसोयच जास्त होते. जे ठरवलेलं असतं ते न होता भलतंच हाती लागतं. खरेदी चुकते, सहलीचा बोजवारा उडतो, प्रकल्प केवळ गोळा बेरजेचं रूप घेतो, सामना हरतो, विक्रीचं गणित फसतं, मग काय करायचं?

पहिली गोष्ट म्हणजे अपयशाची, चुकीची जबाबदारी घ्यायची. कारण निर्णय स्वत:च घेतलाय ना! केवळ कुणी काही सांगितलं अन् त्या प्रभावाखाली तुम्ही निर्णय घेतलेला नाहीये. अपराधी भावना, भीती, निराशा यांना पळून जायला सांगायचं. कोणकोणत्या कारणांमुळे असं झालं असेल याचा पडताळा घ्यायचा. मग लक्षात येतं की, माहिती अपुरी होती, क्षमतांचा पुरेसा अंदाज आला नाही, भोवताली अचानक काही बदल झाले, निकष नीट तोलले नाहीत, इत्यादी.

यामधून नवे धडे शिकत पुढील निर्णय घेण्यासाठी सिद्ध व्हायचं. हेही निर्णयप्रक्रियेचं एक महत्त्वाचं आणि शेवटचं सूत्र आहे. मग या अथक वाटचालीतले तुमचे जिवंत अनुभव कळवणार ना?

♣♣

- वाच. वनिता पटवर्धन
प्रज्ञामानस संशोधिका,ज्ञान प्रबोधिनी,
५१० सदाशिव पेठ, पुणे ४११०३०

## लोकरीच्या धाग्यापासून शुभेच्छा पत्रे



**साहित्य :** वेगवेगळया रंगाचे लोकरींचे तुकडे, हँडमेड पेपर, कात्री, फेव्हिकॉल अगर डिंक, पेन्सिल.

**कृती :** लोकरीचे लहान लहान तुकडे फेकून न देता त्यांचे कापसासारखे कटींग्ज करून ठेवावेत, शुभेच्छापत्रासाठी हॅन्डमेड पेपर्स योग्य आकारात कापून घ्यावेत.त्यावर पाने, फुले, निरनिराळया आकारातील गणपती, चित्रे व अन्य कोणतेही आकारांचे स्केच करून त्यावर फेव्हिकॉल किंवा अन्य कोणताही डिंक लावून त्यावर लोकरीचे कटींग केलेले बारीक तुकडे आवडीच्या रंगानुसार चिकटवावेत. आकर्षक शुभेच्छापत्रे तयार होतील. त्यातून करण्यातलाही आनंद मिळेल अन् ज्याला ते द्याल त्याच्या चेहऱ्यावरही आनंद झळकेल.

**- बळवंत लिमये**, १७६८, गणेशनगर, सांगली ४१६४१६

चैतन्य मंत्र देणाऱ्या सूर्याची करितो भ ती। काळोख दूर करण्याची तो नित्य देतसे श ती।।

**जाणून घ्या...** ग्रंथ - रामायण, भाषा - फ्रेंच, लिपी - देवनागरी, साहित्यप्रकार - निबंध

**पदवीपूर्व/पदव्युत्तर करिअर समुपदेशन -** प्रज्ञा मानस संशोधिका , ज्ञान प्रबोधिनी, पुणे ☎ २४२०७१४४

मुलांचे पान

## झुंज...!

– कु. सिद्धा पाटणकर



''ती बसमध्ये चढली तेव्हा तिला पुढे अंधार आहे, हे माहीत नव्हतं. आणि जेव्हा ती रस्त्यात पडली तेव्हा तिला माहीत नव्हतं, की पुढे प्रकाशाची आशाही आहे...''

'दिल्लीतल्या एका मुलीवर सामुहिक बलात्कार, देशात संतप्त प्रतिक्रिया.'

मुग्धानं वर्तमानपत्र खाली ठेवलं, चहा संपवला आणि टि.व्ही. चालू केला. टि. व्ही. वरही तीच बातमी बघून मुग्धाच्या डो यात विचारचक्र सुरू झालं...

'किती वाईट झालं हे! याचा अर्थ मुली सुरक्षित नाहीतच का? का असं? हे चूक आहे, हे कोणीतरी बदलायला हवं, कोणीतरी का? मीच बदलीन हे!

पण कसं?

''हॅलो, हॅलो रमा अगं मी मुग्धा बोलतेय, आपण त्या पीडित मुलीसाठी काहीतरी करायला पाहिजे...

''काय? कॅन्डल मार्च? नको! त्याने फ त मेणबत्त्या वाया जातात बाकी काहीही होत नाही. आपण, आपण या बाबतीत लोकांचा दृष्टिकोन बदलायचा प्रयत्न केला पाहिजे! तुला आहे ना वेळ? ठीक आहे, ठरलं तर मग... अं.... उद्या संध्याकाळी ६ वाजता भेटू. ठीक आहे? हं बाय.''

चला, रमा, अनुजा, सीमा या त्यांच्या मैत्रिणींना घेऊन येणार आहेत! ठीक आहे...., आता?

***

वेळ – संध्या. ६ वा.

'...आपण या बाबतीत लोकांमध्ये प्रचार करू, गावा गावात खेडोपाडी जाऊन करू. नाहीतर काही वर्षात मुलींना जगतासुद्धा येणार नाही. आपण ठोस पाऊल उचलायलाच हवं! आणि यासाठीच आम्हा चौघींना असं वाटलं की, आपण एक संस्था स्थापन करू आपली! 'सक्षम आम्ही' ही संस्था जागोजागी जाऊन प्रचार करेल! सभा संपली.

***

दिनांक – १५.२.२७

वेळ – सं. ७ वा.

रमा थांबली, तिने समोर ऐकत असलेल्या लोकांकडे बघितलं. २०१२ पासून १५ वर्षांत संस्थेच्या १०च्या १०० सदस्य झाल्या. रमाने भूतकाळचा पट बाजूला सारला. आता त्यांच्या संस्थेचा बोलबाला झाला होता. संस्थेचा विस्तार होत होता. प्रतिष्ठा मिळत होती. प्रसिद्धी मिळत होती. आता मुग्धा अध्यक्ष होती, उपाध्यक्ष अनुजा होती. सीमा खजिनदार/कार्यक्रमाची आयोजक, तर रमा स्वत: सचिव होती, आता म्हणजेच २०२७ मध्ये लोकांचे विचार थोड्या फार फरकाने का होईना पण बदललेले होते. मुली स्वसंरक्षण करायला शिकल्या होत्या.

चौघींना खूप समाधान वाटलं. त्यांनी १५ वर्षांपूर्वी बघितलेलं स्वप्न साकार होत होतं. त्यांच्या त्या रोपाचं झाड होत होतं! त्यांच्या या



गीत गुणगुणती प्रकाश किरणे, चढवित लेणे सृष्टीला। सागरातल्या या लाटांसंगे, जाऊ नभाच्या संगतीला।।

**जाणून घ्या...** ग्रंथ - रामायण, भाषा -जर्मन, लिपी - इंग्लिश, साहित्यप्रकार - निबंध



**राष्ट्रीय प्रश्नांवर मासिक व्याख्यानमाला -** संत्रिका, जनतंत्र उद्‌बोधन मंच, ज्ञान प्रबोधिनी, पुणे ☎ २४२०७१८७

संस्थेला चौघींच्या नवऱ्यांचा पूर्णपणे पाठिंबा होता.

आज संस्थेच्या कामानिमित्त त्या चौघी बाहेर पडल्या होत्या. मुग्धा वेगळ्या वाटेने पुण्याच्या बाहेर संस्थेच्या कामासाठी एका आडगावात जाणार होती. तिच्यासोबत एक ड्रायव्हर होता. तर बाकीच्या तिघी वेगवेगळ्या ठिकाणी कामाला निघाल्या होत्या. चौघींनी एकमेकींचा निरोप घेतला.

मुग्धा निघाली. तिला लवकरात लवकर गावात पोहोचायचं होतं. गाव नजरेच्या टप्प्यात आलं. मुग्धाला घ्यायला एक माणूस आला होता. तो मुग्धाला आत घेऊन गेला. वरती पाटी होती 'राहुल लॉज'. मुग्धाला एक खोली देण्यात आली. मुग्धाने त्या खोलीत आपलं सामान टेवलं आणि ती झोपली. रात्री तिला कसल्यातरी आवाजाने जाग आली. दरवाज्याबाहेर बाचाबाची चालली होती. मुग्धाने दार उघडलं आणि काय होतंय हे कळण्याच्या आत तिला कापडात बांधण्यात आलं. तिने स्वत:ला सोडवायचा खूप प्रयत्न केला; पण ते तिला जमलं नाही. खूप वेळांनी तिच्या डोळ्यावरचं कापड काढण्यात आलं, तेव्हा तिला दिसलं की, तिच्याभोवती काही माणसांचा गराडा पडला आहे. तिला त्यांच्या डोळ्यांत तोच भाव दिसला, जो ती गेली १५ वर्षं बदलण्याचा प्रयत्न करत होती.

''ए बये, तू जे काय करण्याचा प्रयत्न करतेयस ना, तो सोडून दे! उगाच डो याला शॉक देऊ नकोस, परिणाम वाईट होतील! कोण तू? ही तुझी सगळी कामं बंद करायची. कळलं? नाहीतर तुझीही 'तीच' गत होईल, बोल करणार ना तुझे हे मुलींना शहाणपणा शिकवण्याचे धंदे बंद?''

मुग्धा हुशार होती पण आत्ता ती हतबल झाली होती. तिने काही विचार न करता होकार दिला. ''हो खरंच माझ्या हातून पुन्हा असं काहीही घडणार नाही!'' मुग्धा उत्तरली. ''ठीक आहे, आत्ता आम्ही विश्वास ठेवतो तुझ्यावर.''

''आता तुला सोडतोय जा; पण लक्षात ठेव आमचा एक माणूस सतत तुझ्यावर पाळत ठेवील, तुझा मोबाईल आमच्याच ताब्यात राहील. जा, चल नीघ आता!''

एक माणूस मुग्धाला घेऊन निघाला. ते थोडे अंतर लांब गेले. माणूस बेसावध होता. मुग्धाने या संधीचा फायदा घेऊन त्या माणसाच्या डोळ्यांत चिली स्प्रे मारला! आणि मग तिने चाकू मारला. या बेसावध हल्ल्याने तो माणूस गडबडला व खाली पडला. ही संधी साधून मुग्धाने तेथून पळ काढला. खरंच काळ आला होता पण... तिने पोलिसांना फोन लावला. पोलिसांनी तत्परतेनं एफ. आय. आर. केलं. तपासचक्र सुरू झालं.

थोड्याच दिवसांत ते गुंड पकडले गेले. त्यांनी कितीतरी महिलांवर अत्याचार केलेले उघडकीस आले होते. त्यांना फाशीची शिक्षाही सुन्यावण्यात आली. ही बातमी सगळीकडे पसरली. मुग्धावर गुदरलेल्या प्रसंगाने ती मनाने खचली होती. पण इतर तिघींनी दरम्यानच्या काळात तिला धीर दिला. थोड्याच दिवसात सगळ्या सदस्यांची बैठक मुग्धाच्या घरी झाली. त्यात मुग्धाने म्हटले, ''त्या गुडांना शिक्षा झाली ही समाधानाची गोष्ट आहे पण मुळात स्त्रियांवर असे प्रसंग येऊ नयेत आले तरी त्यांनी ताकदिनिशी त्यांचा प्रतिकार करण्यासाठी सक्षम व्हावे यासाठी आपली संस्था काम करते.'' तिने सगळ्यांना एकच प्रश्न विचारला; 'आपण ही जी चळवळ सुरू केली ती थांबवायची की जोमाने सुरूच ठेवायची? सदस्या एकमतानं, एक मुखानं म्हणाल्या, 'समाजातील वाईट प्रवृत्ती आपल्याला बदलायची आहे. त्यामुळे आता मागे न हटता काम सुरू करूया.' मुग्धाला खूप समाधान वाटले. ती म्हणाली खरंच 'तुम्ही सगळ्या हा निर्णय घ्याल अशी खात्रीच होती माझी! त्यामुळे माझ्यावर आलेला हा प्रसंग आपण विसरून नव्याने सुरुवात करूया.' सर्वजणी समाधानाने घरी परतल्या.

♣♣

– **कु. सिद्धा पाटणकर** (इ. ९ वी)
प्लॉट नं. ३८, सर्व्हे नं. २० + २१,
पटवर्धन बाग, एरंडवन, पुणे ४



बिन भिंतीची उघडी शाळा, लाखो इथले गुरू। झाडे, वेली, पशु, पाखरे यांसी गोष्टी करू।।



**जाणून घ्या...** ग्रंथ - रामायण, भाषा - इंडोनेशियन, लिपी - इंग्लिश, साहित्यप्रकार - निबंध

**'उमलत्या' वयाशी जुळवून घेताना** (लैंगिकता शिक्षण व जाणीव संवर्धन) - संवादिनी, ज्ञान प्रबोधिनी, पुणे ☎ २४२०७२२२




# जादुई रूपांतरण

– वाच. नलिनी गुजराथी

**सौ.** सुधाताई आज जाम खुश होत्या; कारण स्वयंपाकघरात फूड प्रोसेसर आणण्याची त्यांची कधीची इच्छा आज पूर्ण झाली होती. फूड प्रोसेसरचं खोकं उघडून एकेक युनिट बाहेर काढणं चालू होतं. त्यात इडली डोशाचं पीठ, मसाले दळायला मि सर होता, चटणी करायला ग्राइंडर होता, फळांचे रस काढायला ज्यूसर होता, आणि कणीक मळायला प्रोसेसर होता. आता प्रत्येक वस्तू वेगळी घ्यायची गरज उरली नव्हती. तर अनेक उपकरणे एकत्र करून फूड प्रोसेसर हे एकच उपकरण बनवलं होतं.

**अनेक वेगवेगळ्या वस्तू, पदार्थ एकत्र करून त्यांची संयु त वस्तू/पदार्थ बनविणे ही रूपांतरणाची सातवी प्रक्रिया आहे. तिचं नाव आहे एकत्रीकरण करणे म्हणजेच इंग्रजीतील Combination.** 'टूइन वन्' या नावाने प्रसिद्ध असलेला ट्रान्झिस्टर कम टेपरेकॉर्डर, सोफा कम बेड ही या रूपांतरणाचीच उदाहरणे. कॉपर आणि झिंक यापासून बनलेला ब्रास हा संयु त धातू (alloy) किंवा स्टेनलेस स्टील, हिंडालियम, मॅग्नेलियम इ. alloys ही अजून काही उदाहरणे सांगता येतील. तर वांगी (Bringal) आणि टोमॅटो या पासून बनलेले ब्रोमॅटो हे फळ, बटाटा (Potato) आणि टोमॅटो पासून बनलेले पोमॅटो (pomato) हे फळ, संत्रे आणि लिंबू यापासून बनलेले लिंत्रे हे फळ, अशी संकरित फळांची संयोगं आपल्याला वनस्पतीशास्त्रात आढळतात. इतकंच काय तर घोडा आणि गाढव यांपासून बनलेला खेचर हा संकरित प्राणी आहे हे तुम्हाला ठाऊक आहे का? याचप्रमाणे मोबाईल आणि कॅमेरा एकत्र केलेले आहेत. भविष्यात अजून कोणकोणती Combination करायला हवीत? भोपळा आणि बटाटा यांचं संकरित बनवता येईल का? सोयाबीन, गहू यांचं संकरित बनवता येईल का? ज्वारी, बाजरी, नाचणी यांचं संकरित धान्य बनविता येईल का? स्कूटरवर छत्री फिट करता येईल का? छत्रीत दिवा लावता येईल का? जरा विचार केलात तर अनेक Combination तुम्हांला सुचतील. जित या भिन्न गुणधर्मांच्या वस्तू एकत्र करता येतील तितके त्यातील नावीन्य वाढेल. पेपरमध्ये मी बेसीन आणि फिश टँक यांच्या Combination ची माहिती वाचली होती व फोटो पाहिला होता. ते मला फारच मजेशीर व वेगळे वाटले.


यानंतरची आठवी प्रक्रिया आहे **Rearrangement!** Rearrangement म्हणजे **पुनर्रचना करणे**. आपल्या घरातील फर्निचरची आपण सजावट करतो. पण ४– ५ वर्षांनंतर तीच तीच रचना पाहण्याचा कंटाळा येतो. घर जुनं झाल्यासारखं वाटतं. पण मग घरातील फर्निचरच्या जागा बदलल्या, पडदे बदलले की घर सुंदर, नवीन वाटायला लागतं. कपाटामध्ये पुस्तके, वह्या, कपडे यांच्या जागा पण आपण सारख्या बदलतो, अधिक सोयीचं होण्यासाठी! नवीन दिसण्यासाठी! रसायनशास्त्रातील मूलद्रव्यांची रचना करणारी आवर्तसारणी मेंडेलीव्ह या शास्त्रज्ञाने केली होती. तिच्यातील उणीवा दूर करून मोस्ले यांनी मूलद्रव्यांची अधिक शास्त्रीय अशी मांडणी Modern Periodic Table मध्ये केली. द्रव्याच्या रेणूंच्या Rearrangement मुळेच घन-द्रव-वायूरूप अवस्था तयार होतात. 'स्पेस शटल'मध्ये अत्यंत कमी जागेत Compact Space मध्ये 'इले ट्रॉनिक सर्किट्स्' आणि 'उपकरणे' बसवावी लागतात. या प्रकारे पुनर्रचना आणखी कुठे कुठे करण्याची आवश्यकता आहे?

एकदा मी एक खूप गंमतशीर घड्याळ पाहिलं. त्यामध्ये काटे स्थिर होते आणि आकडे फिरत होते. आपल्या नेहमीच्या घड्याळ्यात आकडे स्थिर असतात आणि काटे फिरत असतात. बरोबर त्याच्या उलट क्रिया करून हे नावीन्यपूर्ण घड्याळ बनवलं होतं. ही नववी प्रक्रिया. या नवव्या प्रक्रियेला **Reversal** म्हणजेच **उलट करणे, विरुद्ध करणे** असे म्हणतात. प्रतिभेच्या प्रक्रियांमध्ये Reversal ही प्रक्रिया वचितच वापरली जाते. पण जेव्हा





**सहभागी व्हा ! मुलींसाठी - क्रीडा दले, विज्ञान दल -** युवती विभाग, ज्ञान प्रबोधिनी, पुणे - मेधाविनी ☎ ९४२३१६२१३४



वापरली जाते त्यावेळी त्यातून अतिशय, Original, अभिजात अशा कल्पना मिळू शकतात. हॉट कॉफीच्या उलट कोल्ड कॉफी तयार करणे, लँप शेडची दिशा वरती किंवा खालती करणे ही Reversal ची व्यवहारातील काही उदाहरणे ! कारंज्याच्या उलट स्थितीत धबधबा तयार होतो, रिक्षाचं इंजिन पुढे बसवायच्या ऐवजी मागे बसविता येतं. मोटर आणि जनरेटरची तत्त्वे एकमेकांच्या विरुद्ध आहेत. जिना आणि ए सलेटर हे परस्पर विरुद्ध आहेत. जिना स्थिर असून आपण पायऱ्या चढतो तर एस्कलेटर फिरतो व आपण पायरीवर स्थिर राहतो.

♣♣

**जादुई रुपांतरणाच्या यापूर्वीच्या सहा प्रक्रिया**

१. वस्तू आहे त्यापेक्षा मोठी करणे (Magnification)
२. वस्तू आहे त्यापेक्षा लहान करणे (Minification)
३. भर घालणे (Addition)
४. काढून टाकणे (Elimination)
५. गुणधर्मांमध्ये बदल करणे, (Modification)
६. पर्याय शोधणे(Substitution)

**कृतिपाठ – ५**

जादुई रुपांतरणाच्या Combination, rearrangement आणि Reversal या तीनही प्रक्रिया या लेखात आपण पाहिल्या. या तीनही प्रक्रियांवर आधारित नावीन्यपूर्ण उदाहरणे तुम्ही शोधून काढा.

**– वाचस्पती नलिनी गुजराथी**
१२७७, शुक्रवार पेठ, सुभाषनगर, रस्ता क्र. ५, पुणे –२

## कारंजे – करून तर पाहा



**साहित्य –** पाणी, व्हिनेगर, टिश्यू पेपर, बुच असलेली काचेची नळी, खाण्याचा सोडा.

**कृती –** पाणी व व्हिनेगर यांचे समान भाग घेऊन त्याचे मिश्रण करा. ते साधारणत: पाऊण बाटली होईल एवढे असावे. १० सेंमी. × १० सेंमी. असा पातळ (टिश्यू) कागदाचा तुकडा घ्या. त्यावर साधारणत: एक ते दीड चमचा खाण्याचा सोडा घ्या. तो सोडा सारखा पसरून कागदाची गुंडाळी करा. गुंडाळीच्या दोन्ही बाजूला कागद पिरगळून आतून खाण्याचा सोडा बाहेर पडणार नाही अशी काळजी घ्या. बुचाच्या बरोबर मध्ये बसेल अशी काचेची नळी असावी.

बाटलीतल्या व्हिनेगरमिश्रित पाण्यात सोडा बायकॉर्ब अथवा खाण्याच्या सोड्याची गुंडाळी सोडा. नळी असलेले बूच बाटलीच्या तोंडावर घट्ट बसवा.

बाटलीतील गुंडाळी ओली झाली की, व्हिनेगरच्या व सोड्याच्या संयोगाने कार्बन डायऑ साईड वायू निर्माण होऊ लागेल. त्यांचे बुडबुडे वर येताना दिसतील.

बाटलीत होणाऱ्या वायू निर्मितीमुळे, यातील हवेचा दाब वाढेल. त्या दाबामुळे बाटलीतील पाणी नळीमध्ये वर चढू लागल्यावर, थोड्या वेळाने तो दाब इतका वाढेल की, बुचाला लावलेल्या नळीमधून झ कपैकी पाण्याचे कारंजे उडू लागेल. कारंजे जास्त उंच जावयास हवे असेल, तर अगदी बारीक भोकाची तोटी बुचावर लावलेल्या काचेच्या नळीवर बसवा. हा प्रयोग मोकळ्या जागेत करा. नाहीतर सामान भिजेल व खराबी होईल.

**– संकलित**

ज्योती विझू आली तरी, तेज न सरावे। गीत गाता ये ना तरी, स्वर असू द्यावे।।

**जाणून घ्या...** ग्रंथ - रामायण, भाषा - कंबोडियन, लिपी - कंबोडियन, साहित्यप्रकार - काव्य



**७वी ते ९वीच्या मुलामुलींसाठी- सामूहिक विद्याव्रत संस्कार -** संत्रिका व संवादिनी, ज्ञान प्रबोधिनी, पुणे ☎ २४२०७२२२

# वेलाला केले गुरू



इंजिनियरिंग व मॅनेजमेंट शिकल्यावर आपणास सर्व काही कळते असा एक (वृथा) अभिमान माझ्यात निर्माण झाला होता. परंतु जमेची बाजू अशी, की चौकस दृष्टी ठेवून, कुणाकडूनही काही नवीन शिकण्याची वृत्ती अजून लोप पावली नव्हती. देवांनीसुद्धा कुणाकुणाला गुरू करून त्यातून ज्ञान मिळविले. एका वर्षी घोसाळ्याचा वेल जो मी बागेत लावला होता, त्याच्या निरीक्षणातून मी त्याला माझा गुरूच करून टाकले !

पावसाळ्याच्या सुरुवातीला जमिनीत लावलेल्या बियातून वेलाची रोपे फुटली व भिंतीच्या आधाराने वर चढू लागली. त्यांना मी जेव्हा काथ्याच्या दोरीचा आधार देऊन गच्चीची दिशा दाखविली तेव्हा मात्र वेल भराभर वाढायला लागला. विशिष्ट अनुकुलता येईपर्यंत ही वाढ होत नव्हती; पण अनुकुलता आल्यावर वृद्धी जोरात झाली. १०-१५ फूट वाढूनही वेलाला फुले-फळे लागेनात. पण एकदा गच्चीच्या भिंतीपर्यंत वेल गेला व कठड्यावर आडवा पसरू लागला तेव्हा एकदम फुले लागली. पिवळीधमक फुले, त्यांवर खूप भुंगे यायला लागले व त्यांची तोंडे पावडरने पार पिवळी व्हायला लागली. पिवळ्या फुलांची ही जाहिरात करून वेल जणू भुंग्यांना आमंत्रण देत होता.

आधार शोधायची वेलाची लृप्ती तर अफलातून होती. पहिल्यांदा एक ताण यायचा. तो इकडे तिकडे फिरून आधार शोधायचा. आधार सापडला की ताण स्वत:ला स्प्रिंगमध्ये रूपांतरित करायचा. लोज कॉईल हेलिकल स्प्रिंगचे डिझाईन तयार व्हायचे. स्प्रिंग का तर वेल वाऱ्याने हालला तरी स्पिंग ती हालचाल सामावून घ्यायची. अशा देखण्या स्प्रिंगचा आधार घेत, वेल गच्चीवर पसरू लागला.

हळूहळू घोसाळी लागली. जिथे भ कम आधार होता. तिथेच फळे यायची. एका ठिकाणी वेल जमिनीपासून फूटभर अंतरावरून गेला होता. तेथे 'उ' च्या आकाराची घोसाळी लागली, जी जमिनीला टेकत नव्हती.

जी घोसाळी मोठी झाली, त्यातली दोन-चार वेलावरच वाळू दिली. ती काढल्यावर आतल्या बिया व जाळी काढली की त्याची एक पर्स तयार होते. जाळी तर इतकी अनोखी की अंग घासायला, वस्तू साफ करायला फार उपयोगी पडते. ओली केली की मऊ होते, वाळली की खरखरीत. खूप दिवस टिकते. अशी घासणी प्लॅस्टिक किंवा काही वापरून करणे श यच नाही. वेला, मानले तुला !

ताज्या घोसाळ्याची भजी तर अप्रतिम लागतात. अशा माझ्या या गुरूने परिस्थितीनुरूप कसे बदलावे, आपल्या प्रगतीला आधार कसा शोधावा, आधाराशिवाय फळाची अपेक्षा कशी धरू नये, अनुकूलतेकडेच प्रवास कसा करावा, आपल्या प्रॉड टची जाहिरात कशी करावी हे सर्व शिकविलेच पण स्प्रिंगा व घासण्या कशा कराव्यात याचे इंजिनियरिंगही दाखवून दिले. असा अनोखा वेल लावून तुम्हीही निरीक्षणाचा आनंद घ्यावा.

♣♣

- **श्रीरंग गोखले**, २७/४३ नवसह्याद्री, पुणे ४२ skg2743@gmail.com

(पान क्र. १३ वरील कोड्याचे उत्तर
अ- ३६, ब -वाशिम)



विज्ञानाने पंख दिले, झेपावण्या आकाश दिले। अज्ञानाच्या अंधारात, प्रकाशाचे किरण दिले।।

**जाणून घ्या...** ग्रंथ - रामायण, भाषा - नेपाळी, लिपी - देवनागरी, साहित्यप्रकार - काव्य, कथा



NTS मार्गदर्शन, विविध कौशल्यांचे प्रशिक्षण - बुद्धिमत्ता संवर्धन केंद्र, ज्ञान प्रबोधिनी, पुणे ☎ २४२०७१९४

# छात्र प्रबोधन - दीपावली विशेषांकाची वितरण व्यवस्था २०१३

यावर्षी महाराष्ट्र व गोवा मिळून ११८ गावांमध्ये १२३ वितरण केंद्रांद्वारा 'छात्र प्रबोधन'च्या दीपावली विशेषांकांची वितरण व्यवस्था केली आहे. या वितरण केंद्रांचे पत्ते व दूरभाष क्रमांक खाली दिलेले आहेत. सभासदांनी २५ ऑ टोबरनंतर आपला दिवाळी अंक आपल्या गावातील वितरण केंद्रावरून, हा किंवा या वर्षातील कोणताही अंक दाखवून घेऊन जावा.

आपल्या गावातील वितरण केंद्राच्या पत्त्यावर/दूरभाष क्रमांकावर संपर्क होऊ शकला नाही तर त्या त्या विभागातील विभागसंपर्क प्रमुखांशी संपर्क साधावा.

ज्या सभासदांनी रजिस्टर पोस्टाने दिवाळी अंक पाठविण्यासाठी रु. ४०/- जादा भरले आहेत, (भरले नसल्यास व घरपोच दिवाळी अंक हवा असल्यास १५ ऑ टोबरपर्यंत छात्र प्रबोधनच्या पत्त्यावर समक्ष/M.O.ने रु.४०/- पाठवावेत) त्यांना दिवाळी अंक घरपोच पाठविले जातील. ज्या गावांमध्ये वितरण केंद्रे नाहीत, त्या गावांमधील इतर सभासदांना साध्या पोस्टाने अंक पाठविले जातील. अंक न मिळाल्यास वेगळा अंक पाठविला जाणार नाही.

दीपावली विशेषांक अधिकाधिक जणांना वेळेत व खात्रीशीर मिळावा, यासाठी केलेली ही व्यवस्था यशस्वी होण्यासाठी, सर्व सभासद सहकार्य करतील असा विश्वास वाटतो. वितरण केंद्र सांभाळणाऱ्या व्य ती त्यांच्या नित्य व्यापातून वेळ काढून, स्वयंसेवी वृत्तीने हे कार्य करीत आहेत याची जाणीव सभासदांनी ठेवावी व कार्यकर्त्यांना सहकार्य करावे ही विनंती.

**• विभागवार वितरण केंद्र संख्या •**

| विभाग | विभाग केंद्र | केंद्रसंख्या |
|---|---|---|
| १. पश्चिम मुंबई | बोरिवली | ९ |
| २. मध्य मुंबई, ठाणे | डोंबिवली | ५ |
| ३. रायगड, नवी मुंबई | अलिबाग | ११ |
| ४. रत्नागिरी, सिंधुदुर्ग | चिपळूण | १२ |
| ५. गोवा | फोंडा | ६ |
| ६. कोल्हापूर | इचलकरंजी | ५ |
| ७. सांगली | सांगली | ६ |
| ८. सातारा | सातारा | ६ |
| ९ सोलापूर | सोलापूर | ३ |
| १०. अहमदनगर | कर्जत | ६ |
| ११. उ. महाराष्ट्र | चोपडा | १७ |
| १२. मराठवाडा | अंबाजोगाई | १६ |
| १३. विदर्भ | अकोला | १० |
| १४. पुणे | पुणे | ११ |
| एकूण केंद्रांची संख्या | | १२३ |

## विभाग १. पश्चिम मुंबई - विभाग संपर्कप्रमुख - सौ. सुमिता पांढरे (बोरीवली) - ☎ ९९६९०५१५७३

**बोरीवली** – सौ. सुमिता पांढरे, ए-१०२ दत्तधाम, देवीदास लेन, बोरीवली (प.) ☎ ०२२-२८९११६४१/९९६९०५१५७३

**विलेपार्ले** – श्री. दत्तात्रय जोशी, सी-२३, प्राची सोसायटी, शहाजीराजे मार्ग, पार्ले बिस्किटजवळ, विलेपार्ले (पू.), ☎ ९८६९०६३७७२

**बांद्रा** – श्री. मिलिंद चिंदरकर, द्वारा महात्मा गांधी विद्यामंदिर, गव्हर्नमेंट कॉलनी, बांद्रा (पू. ), मुंबई ☎ ९३२२२४२५६९

**गिरगाव** – श्रीमती शिरीषा खरे, चंद्रशेखर बिल्डिंग, ७३- ब, जगन्नाथ शंकरशेठ मार्ग, गिरगाव, मुंबई ☎ ०२२-२३८८६९३५

**चेंबूर** – कु. मधुरा पंडित, ३-डी, दहावा रस्ता, गावठाण चेंबूर, मुंबई ☎ ९८६९४५०००१

**विरार-वसई** – श्री. फ्रान्सिस डिमेलो, विश्वशांती, २ तलाव, वतार, पोस्ट आगासे, ता. वसई, जि. ठाणे ☎ ९८५०१८२६६१

**पालघर** – श्री. तुषार राऊत, मु. पो. माहिम (आगर), कर्मवीर ज. पा. राऊत मार्ग, पालघर, जि. ठाणे ☎ ९८६०२०३१००

**दादर** – श्री. सतीश पै, तळ मजला, पर्ल सेंटर, सेनापती बापट मार्ग, दादर (प.) मुंबई २८ ☎ ९८२०२६७३२७

**अंधेरी** – सौ. धनश्री शिंदे, १२अ, रूम नं. ६०३, ओम साई सोसा. साईवाडी, तेली गल्ली, अंधेरी (पू.) ☎ ९७०२५२७२८४

सत्कृत्याला सद्भावाची जोड हवी। आकाश पूजा आदर्शाची करू या नित्य नवी।।

**जाणून घ्या...** ग्रंथ - रामायण, भाषा - रशियन, लिपी- इंग्लिश देवनागरी, साहित्यप्रकार - निबंध / कथा

UPSC परीक्षा पूर्वतयारी वर्ग - स्पर्धा परीक्षा केंद्र, ज्ञान प्रबोधिनी, पुणे ☎ २४२०७१४४

## विभाग २. मध्य मुंबई, ठाणे - विभाग संपर्कप्रमुख – सौ. स्मिता चावर (डोंबिवली) ☎ ९९३०१४५२११

**ठाणे** – सौ. सुप्रिया बर्वे, ३०१, निशिगंधा, म. कर्वे मार्ग, ३ रा मजला, बेडेकर हॉस्पिटलजवळ, नौपाडा (प.) ☎०२२-२५३६४३६४

**डोंबिवली** – सौ. ज्योती कर्वे, राधागोविंद निवास, रामनगर पोस्टाजवळ, डॉ. राजेंद्रप्रसाद रस्ता, डोंबिवली (पू.) ☎ ९९६९६१५८४७

**कल्याण** – सौ. स्मिता मनोरे, डी.२/७ रत्नभिमा सोसा., डॉ. आचार्य हॉस्पिटलजवळ, बैलबाजार, कल्याण (प.) ☎ ९९२०९४८७७८

**अंबरनाथ** – सौ. अश्विनी कुलकर्णी, प्लॉट नं. ५५२, इंद्रप्रभा, ३ रा मजला, खेर से शन, अंबरनाथ (पू.) ☎ ०२५१-२६०१४११/९८१९४५०९१०

**बदलापूर** – श्री. चिंतामणी उगले, १०४ शकुनव्हिला सोसा., सानेवाडी, कुळगांव–बदलापूर (प.) ☎ ९४२३०८९७७४

## विभाग ३. रायगड, नवी मुंबई - विभाग संपर्कप्रमुख – श्री. राम जोशी (अलिबाग) ☎ ९४२०८३५६५०

**खोपोली** – श्री. सुहास सेलूकर, आशियाना इस्टेट, बि. नं. ३, फ्लॅट न. १०३, वीणा नगर, खोपोली ☎ ९५६१८४५१०६

**अलिबाग** – श्री. राम जोशी, १ कृष्णविहार, समर्थनगर, पिंपळभाट, अलिबाग ☎ ०२१४१-२२५३०९/९४२०८३५६५०

**नागाव** – सौ. स्नेहा जोशी, नागाव हायस्कूलजवळ, नागाव, ता.अलिबाग ☎ ०२१४१-२४५६६१

**नागोठणे** – सौ. सुलभा गोखले, एस.एन. बी.३, सुरक्षा नगर, रिलायन्स टाऊनशीप, नागोठणे, ता. पेण ☎ ०२१९४-२७७९०३/९७६६३९२५६४

**मुरुड** – सौ. दीपाली जोशी, गणेश आळी, मुरुड, ता. मुरुड–जंजिरा, जि. रायगड ☎ ०२१४४-२७४४३९

**देवगड** – श्री. जयेश खाडिलकर, हॉटेल प्रपंचच्या मागे, मेनरोड, ता. देवगड, जि. सिंधुदुर्ग ☎ ९४०३५९५१७५

**महाड** – श्री. डी. एस्. सावंत, सावित्री, नवेनगर, महाड, जि. रायगड ☎ ९८२२६२६९३२

**रसायनी** – सौ. शुभदा कोकीळ, ५ अ, वरदविनायक सोसा., राममंदिरासमोर, पो. मोहपाडा, ता. खालापूर ☎ ९८८१९०३६७३

**पनवेल** – सौ. गुंजन कुलकर्णी, बी–३/१०, अशोका गार्डन सोसा., म. फुले रोड, पनवेल ☎ ०२२-२७४५४५०७/९९३०८८२८७०

**सानपाडा** – सौ. शीला ठाकूर, माध्यमिक विद्यालय, विवेकानंद संकुल, से टर नं. ४, सानपाडा, नवी मुंबई ☎ ९८६९४३८७०४

**वाशी** – सौ. विजयालक्ष्मी पाटगावकर, जे. एन. ३/११/१५, सप्तगिरी अपार्ट. से टर ९, वाशी, नवी मुंबई ☎ ०२२-२७८०१९६८

## विभाग ४. रत्नागिरी,सिंधुदुर्ग - विभाग संपर्कप्रमुख – श्री. प्रसाद काणे (चिपळूण) ☎ ९४२२४३०९००

**रत्नागिरी** – १) सौ. प्रतिभा प्रभुदेसाई, प्रभुदेसाई हॉस्पिटल, 'चिंतामणी', टिळक आळी,रत्नागिरी ☎०२३५२-२२२९५३
२) श्री. राजेश आयरे रा. भा. शिर्के प्रशाला, गुरुकुल, माळानाका, जि. रत्नागिरी ☎ ७२७६७३०२६९

**पावस** – सौ. शीतल सामंत, गणेश मंदिराजवळ, समाधी मंदिर रस्ता, पावस, जि. रत्नागिरी ☎ ९४२११३९५३०

**चिपळूण** – श्री. प्रसाद काणे, श्रीकृपा, आदर्श निवास लॉज, शिवाजी चौक, चिपळूण ☎ ९४२२४३०९००

**गुहागर** – श्रीमती मीरा साठे, सुमती निवास, खालचा पाट, गुहागर, जि. रत्नागिरी ☎ ०२३५९-२४०११२/९४२११४१५२८

**राजापूर** – श्री. संजय कुलकर्णी, मु. पो. पाचल, ता. राजापूर, जि. रत्नागिरी ☎ ९४२१२२९७५७

**खेड** – सौ. नम्रता दामले, बडे हॉस्पिटलसमोर, खेड, जि.रत्नागिरी ☎ ९४२२४३३९४९

**कुडाळ** – श्री. उमेश सामंत, द्वारकाभाई, गुढीपूरवाई, पिंगुळी, ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग ☎ ९४२२९६३५१७

**सावंतवाडी** – सौ. वंदना करंबेळकर, बी/७, नूतन हौ.सोसा., सबनीसवाडा, सावंतवाडी, जि. सिंधुदुर्ग ☎ ९८५०४७३०१२

**कणकवली** – श्री. औदुंबर भागवत, नक्षत्र आपा., बी. विंग, घर क्र. ६, कॉलेज रस्ता, कणकवली, जि. सिंधुदुर्ग ☎ ९४२११४७५१३

**तळेरे** – डॉ. मनीषा नारकर, अमृता नर्सिंग होम, मु. तळेरे, ता. कणकवली, जि. सिंधुदुर्ग ☎ ०२३६७-२४००८२/९४२२४३५४०१

**लांजा** – डॉ. अशोक शहाणे, स्वानंद, वैभव वसाहत, लांजा, जि. रत्नागिरी ☎ ९४२११८९२४७

## विभाग ५. गोवा - विभाग संपर्कप्रमुख – श्री. मोहन आमशेकर (फोंडा) ☎ ९४२२०५८८७३

**फोंडा** – श्री. मोहन आमशेकर, डी–१, कपीला सोसायटी, खडपाबांध, फोंडा, गोवा ☎ ९४२२०५८८७३

हासत हासत जीवन जगावे, इतरांसही सदा हसवावे । राग, दुःखावर पांघरावे, असे हसणे दुर्मिळ नसावे ।।

**जाणून घ्या...** ग्रंथ - रामायण, भाषा - थाई, लिपी - थाई रोमन, साहित्यप्रकार - काव्य, कथा



**छात्र प्रबोधन मासिकाचे सभासद व्हा व त्यातील उपक्रम, स्पर्धेत भाग घ्या -** छा. प्र. ज्ञान प्रबोधिनी, पुणे ☎ २४२०७१०६

**मार्दोळ** – श्री. शिरीष आमशेकर, मुख्याध्यापक, स्वस्तिक विद्यालय, प्रियोळ, मार्दोळ, फोंडा, गोवा ☎ ९४२११५७९२२
**वास्को** – सौ. दिपा गावकर, सी४ दुसरा मजला ब्लॉक डी अंतरिक्ष मनोर, आल्तो, दाबोली ☎ ९९२१८९७०९६
**परवरी** – श्री. वैभव केळकर, डी.एल. सामंत मेमोरिअल हायस्कूल, आल्तो, परवरी, बारदेश गोवा ☎ ९४२०८१८४८३
**म्हापसा** – श्री. प्रशांत बर्वे, श्री कन्स्ल्टंटस्, द्वारकानाथ सेंटर, दुसरा मजला, म्हापसा–कळगुंट रोड, म्हापसा ☎ ९४२२४५६५५५
**डिचोली** – श्री. गणेश जोशी, साष्टीवाडा, बोर्डे, डिचोली, गोवा ☎ ९४०५९२१२३१

## विभाग ६. कोल्हापूर - विभाग संपर्कप्रमुख – श्री. विनायक गद्रे (इचलकरंजी) ☎ ९८८१५९००१८

**कोल्हापूर** – सौ. रेश्मा जोशी, फ्लॅट नं. एफ २, मौनी विहार, टाकाळा कॉर्नर , कोल्हापूर ☎ ८८०५००४२२१
**इचलकरंजी** – श्री. विनायक गद्रे, ५, घर नं.६८अ, झेंडा चौक, इचलकरंजी, जि. कोल्हापूर ☎ ८८०५००४२२१
**कुरुंदवाड** – श्री. गोपाळ जोशी, मुंढेकर वाडा, कुंभार गल्ली, गणपती मंदिराजवळ, कुरुंदवाड ☎ ९८५०९६४८१९
**हुपरी** – सौ. सुधा सांगवडेकर, राजगुरूनगर, नवीन वसाहत, हुपरी, ता. हातकणंगले ☎ ९०२८८५२०५२
**महागाव** – श्री. सुभाष सुतार, महात्मा फुले विद्यालय, महागाव, ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर ☎ ९०९६७१२८१३

## विभाग ७. सांगली – विभाग संपर्कप्रमुख – पंकज पेडणेकर (सांगली) ☎ ९६३७०६६६१९

**सांगली** – श्री. शैलेंद्र केळकर, ६९२, गावभाग, खाडिलकर गल्ली, सांगली ☎ ९४२२६१६०५८
**तासगाव** – श्री. प्रसाद हसबनीस, ग्रामपंचायत कार्यालयासमोर, तुपारी, ता. पलुस, तासगाव जि. सांगली ☎ ९४२३८१०४०९
**३२ शिराळे** – श्री. नाथाराव हसबनीस, घ.नं. ४६९, दत्तमंदिराजवळ, पूल ग ी, बत्तीस शिराळा ☎ ०२३४५ – २७११८६ /९७६७६८०७०१
**कडेगाव** – डॉ. मकरंद बर्वे, बर्वे हॉस्पिटल, एस.टी.स्टँडजवळ, कडेगाव, जि.सांगली ☎ ०२३४७ – २४२१०८/९९२२२१२९०३
**इस्लामपूर** – सौ. स्वाती कुलकर्णी, मानस ग्रंथालय, के. बी. पी. कॉलेज रस्ता, इस्लामपूर ☎ ०२३४२–२२१९६१/९४०४३५९२६२
**मिरज** – श्री. संजय कुलकर्णी, आशीर्वाद अकौंटन्सी लासेस, पाण्याच्या टाकीसमोर, किल्ला, मिरज, सांगली ☎ ९४२३२६९५४६

## विभाग ८. सातारा - विभाग संपर्कप्रमुख – श्री. सतीश कुलकर्णी (सातारा) ☎ ९४२३२६०२६०

**सातारा** – श्री. सतीश कुलकर्णी, प्लॉट नं. ५१, सर्व्हे नं. ३२०–१ अ, अंजली कॉलनी, करंजे तर्फ, सातारा ☎ ९४२३२६०२६०
**कोरेगाव** – डॉ. मिलिंद शहा, पूजा नर्सिंग होम, रहिमतपूर रस्ता, कोरेगाव, जि. सातारा ☎ ९८२२०२३२०८
**कराड** – श्री.दत्तात्रय कुलकर्णी, ४५६–डी, सोमवार पेठ, पंताचा कोट, नावडीकर वाडा, कराड ☎ ०२१६४–२२२५०५
**उंब्रज** – डॉ. धनंजय कुलकर्णी, जय श्रीराम लिनिक, कॉलेज रस्ता, उंब्रज, ता. कराड ☎ ९४०३५४६९१३, ९४२३३२१२१३
**खंडाळा** – श्री. अ. ल. फाळके, कोर्टाच्या मागे, खंडाळा, जि. सातारा, ☎ ९८९०६०९६३१
**पाटण** – श्री. दत्तात्रय नांगरे, मु. पो. मारुल हवेली, ता. पाटण, जि. सातारा. ☎ ०२३७२–२८६८५८/८२७५४५७२७८

## विभाग ९. सोलापूर - विभाग संपर्कप्रमुख – श्री. राजशेखर कांबळे (सोलापूर) ☎ ९८९०४१५८५१

**सोलापूर** – ज्ञानप्रबोधिनी बालविकासमंदिर, १५७, रेल्वेलाइन्स, डफरीन चौक, सोलापूर ☎ ०२१७–२३१७७८२/९६८९९९९२००
**पंढरपूर** – श्री. दीपक इरकल, २३४०, होळकरवाडा, महाद्वार, पंढरपूर, जि. सोलापूर ☎ ९४२३५६३८९५
**मोहोळ** – श्री. बापूसाहेब दळवे, राष्ट्रमाता इंदिरा कन्या प्रशाला, ता. मोहोळ, जि. सोलापूर ☎ ९८५०३६३४८८

## विभाग १०. अहमदनगर - विभाग संपर्कप्रमुख – श्री. गजानन चावरे (कर्जत) ☎ ९९६०११८५८६

**अहमदनगर** – सौ. स्नेहल धर्माधिकारी, ३६२५, डांगे गल्ली, माणिक चौक, अहमदनगर ☎ ९४२२०८४६१३
**संगमनेर** – श्री. अशोक भारंबे, स्वामी हौ. कॉम्प्ले स, परदेशपुरा, संगमनेर ☎ ०२४२५–२२२६६२/९९२१६४४२११



ग्रंथ उजळती अज्ञानाच्या, अंधाराच्या राती। या ग्रंथाच्या तेजामधुनी जन्मा येते क्रांती।।

**जाणून घ्या...** ग्रंथ - रामायण, भाषा - लाओस, लिपी- इंग्लिश, साहित्यप्रकार - निबंध



**युवक युवतींसाठी प्रिपरेटरी व फाउंडेशन कोर्स -** डिसेंबरपासून नवीन तुकडी-नेतृत्व संवर्धन केंद्र, ज्ञान प्रबोधिनी ☎ २४२०७१७४

**कोपरगाव** – डॉ. अंजली फडके, फडके हॉस्पिटल, धरणगाव रस्ता, कोपरगाव ☎ ९३२५९५०१२१

**शिर्डी** – डॉ. प्रबोध जोशी, जोशी हॉस्पीटल, शिर्डी ☎ ९४२१५५८४६६

**कर्जत** – श्री. दिपक लांगोरे, लांगोरे गल्ली, डॉ. काकडे हॉस्पिटलजवळ, ता. कर्जत, जि. अहमदनगर ☎ ९४२३४६५६४७

**पारनेर** – सौ. सविता रेपाळे, पानोली रोड, मराठा कॉम्प्ले स तळमजला, पारनेर ☎ ९९२२२२७११८, ९९२२२५१६६७

## विभाग ११. उत्तर महाराष्ट्र - विभाग संपर्कप्रमुख – श्री. पवन लाठी (चोपडा) ☎ ९४२३९१५५२९

**नाशिक** – श्री. अनिल दंडगव्हाळ, श्रीहरी प्लॉट नं. ४१४, चाण यनगर, कामटवाडे शिवार, नाशिक ☎ ९४२२२४८२६४

**बोलठाण** – डॉ. सुभाष जोशी, मु. पो. बोलठाण, ता. नांदगाव, जि. नाशिक ☎ ०२५५२–२४५३१८/९८८१८२६६०१

**मालेगाव** – डॉ. रागिणी भिलसेकर, वीर सावरकर नगर, कले टर पट्टा, सटाणा नाका मालेगाव,नाशिक ☎ ९५०३२२२३९६

**धुळे** – श्री. एन. एम जोशी, घासकडबी विज्ञान प्रयोगिका, स्माई, व्यंकटेश सभागृह, नगरपट्टी, ५वी गल्ली, धुळे ☎ ९४२१५००८८२

**देऊर बु।।** – श्रीमती स्वरूपा देवरे, मुख्याध्यापक माध्यमिक कन्या विद्यालय, देऊर बु. ।।, जि. धुळे ☎ ७५८८६२८८११

**साक्री** – श्री. चंद्रकांत देविदास पंचभाई, मु. पो. कासारे, ता. साक्री, जि. धुळे ☎ ०२५६८ – २७४२५१/९४२१५३७५०४

**शिरपूर** – प्रा. वैशाली पाटील–देवरे, आय.एम.आर.डी. कॉलेज कॅम्पस, करवंद नाका, शिरपूर ☎ ९८२३२९९९७३

**दोंडाईचा** – श्री. सुभाष जैन, द्वारा – किर्ती मेडिकल स्टोअर्स, शिवाजी मार्ग, दोंडाईचा, जि. धुळे ☎ ९८२३४१६८४४

**नंदूरबार** – डॉ. वैशाली काणे, डॉ. काणे हॉस्पिटल, धुळे रस्ता, ३१ दत्तनिवास, नंदूरबार ☎ ९४२३९८०२९६

**शहादा** – सौ. सुनिता पटेल, सुश्रुत नर्सिंग होम, खेतीया रोड, शहादा, नंदूरबार ☎ ०२५६५–२२३४४६/९४२०२७११०१

**जळगाव** – १) श्री. अनिल भोळे, द्वारा पांडेज् लासेस, ट्रॅफिक गार्डनसमोर, जळगाव ☎ ९४२०६६२७१४

२) श्री. अजय नाईक, १२/३ मकरंदनगर, हनुमान हौ. सोसायटीजवळ, जि. जळगाव ☎ ९४०३४२६४३०

**अमळनेर** – श्री. दत्तात्रय सोनावणे, लंबोदर, प्लॉट नं. ७४ अ, श्रीमंत प्रतापशेठ नगर, प्रताप मिल कंपाऊंड, अमळनेर ☎ ९४२०१११९८२

**भडगाव** – डॉ. सुवर्णा पाटील, द्वारा–डॉ. दिलीप पाटील, चिंतामणी हॉस्पिटल, मेन रोड, भडगाव, जि. जळगाव ☎ ७५८८०१०६७५

**चोपडा** – श्री. सुधाकर केंगे, विवेकानंद नगर, यावल रस्ता, चोपडा जि. जळगाव ☎ ९४२३९१५५२९

**चाळीसगाव** – डॉ. मुकुंद करंबेळकर, शल्यशोभा, करगाव रस्ता, चाळीसगाव, जि. जळगाव ☎ ९८२२२६३२७९

**भुसावळ** – श्री. अनिल जोशी, मु ताई, पुरुषोत्तमनगर, भुसावळ ☎ ०२५८२–२२११५३/९३२६११८०२८

## विभाग १२. मराठवाडा - विभाग संपर्कप्रमुख – श्री. केदार वाघमारे (अंबाजोगाई) ☎ ९४२१९६०५९९

**औरंगाबाद** – १) चि. शुभम् जोशी, प्लॅट नं.७, सूर्यकिरण अपार्ट,जालान नगर, रेल्वेउड्डाण पूलाजवळ, पैठण रस्ता ☎ ९४०३६२९१३८

२) सौ. भारती कुलकर्णी, घर क्र. ५, म्हाडा कॉलनी, प्रतापनगरच्या समोर, औरंगाबाद ☎ ९३२४०११३४९

**कन्नड** – श्री. प्रशांत कोटकर, यज्ञप्रकाश तुळजाभावानी एस.टी.डी.समोर, कन्नड, जि. औरंगाबाद ☎ ९४२१५१४६७६

**जालना** – १) श्री. विजय देशमुख, डॉ. प्रभू यांच्याशेजारी, भाग्यनगर, जुना जालना ☎ ९४२३४५७६५५

२) श्री. चंद्रकांत दायमा, ब्लॉ. नं. ३, राज बिल्डिंग, अंबर हॉटेलशेजारी, नवीन जालना ☎ ९४२१८६१५४८५

**बीड** – श्री. कैलास लिंगे, द्वारा – सरवदे, सद्गुरूकृपा, जवाहर कॉलनी, हॉटेल रायरीशेजारी, नगरनाका, बीड ☎ ९८८१४५१३५७

**गेवराई** – श्री. सदानंद कुलकर्णी, संकल्प निवास, तगडगाव रस्ता, सरस्वती कॉलनी, गेवराई ☎ ९४२२७०७४६८

**अंबाजोगाई** – ज्ञान प्रबोधिनी, मधुस्मृती, केशवनगर, अंबाजोगाई, जि.बीड ☎ ९९६०४०३१४४

**माजलगाव** – श्री. निरंजन वाघमारे, उष:काल निवास, यशवंत करिअर ॲकॅडमी, कालिकानगर, माजलगाव ☎ ९८८१८६७१२३

**धाराशिव** – श्री. बालाजी माळी, द्वारा – सुनील महाजन, बनशंकरी, समर्थनगर, धाराशिव ☎ ९४०३३९११०६



. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .

विपत्तींना जो न भीत, धैर्य सदा राही उभा ताठ। प्रयत्नांचा खरा वाली, प्रभुजी राखतो पाठ।।

**जाणून घ्या...** ग्रंथ - रामायण, भाषा - रुमानी, लिपी- इंग्लिश, साहित्यप्रकार - कोश



**नागरीवस्त्यांमधील किशोरींसाठी उपक्रम -** नागरीवस्ती अभ्यासगट, ज्ञान प्रबोधिनी, पुणे - हर्षाताई ☎ ९३२५२७२३३७

**हराळी** – ज्ञान प्रबोधिनी, द्वारा दिपक कांबळे, हराळी, डाक तोरंबा, ता. लोहारा, जि. उस्मानाबाद ☎ ०२४७५–२६०१०२

**लातूर** – श्री. अमोल होनमाळे, श्याम नगर, गगन विहार जवळ, बोरगावकर लासेस समोर, अंबाजोगाई रोड, लातूर ☎ ८१४९९६०५५५

**परभणी** – श्री. प्रताप देशपांडे, द्वारा–श्री. खेडकर, हनुमान मंदिराशेजारी, लोकमान्य नगर, परभणी ☎ ९४०४९७४६१९

**सेलू** – श्री. भालचंद्र गांजापूरकर–जोशी, १८१ मल्हार, विद्यानगर (प.), रेस्ट हाऊस जवळ, सेलू ☎ ९४२२८६९५२२

**वसमतनगर** – श्री. जी. आर आर्किलवाड, बहिर्जी स्मारक विद्यालय, वसमतनगर, ता. वसमत, जि. हिंगोली ☎ ९८२२८८८३०६

**नांदेड** – सौ. मीरा तातोडे, ए १ – ९८, काबरा नगर, पावडेवाडी रोड, नांदेड ☎ ०२४६२ – २६११२८/९८८१०९१०५४

## विभाग १३. विदर्भ विभाग संपर्कप्रमुख – श्री. भूषण बापट (अकोला) ☎ ९८५०३८६४९४

**नागपूर** – सौ. ओजस्विनी जामदार, यशश्री, १५ दक्षिण, अबाझरी रोड, मुकव बधिर शाळेसमोर, शंकरनगर कॉर्नर, नागपूर ☎ ९६७३१३३३८८

**अकोला** – श्री. भूषण बापट, द्वारा मिहीर उद्योग केंद्र, 'केशव अर्चना', गांधी चौक, अकोला ☎ ९८५०३८६४९४

**वाशीम** – डॉ. सुनिता घुडे, अंकुर हॉस्पिटल, सिव्हील लाईन्स, वाशीम ☎ ९८२२२०४५१५

**अमरावती** – १) श्री. प्रदीप व्यवहारे, ५, श्रेयस, हरिओम कॉलनी, जेल रस्ता, कॅम्प, अमरावती ☎ ९८६०६७४७७२

२) सौ. विद्या कुलकर्णी, ऋषीप्रसाद, पुष्कराज कॉलनी, मु. पो. सातुणी, अमरावती ☎ ९४२३१२४५९२

**वर्धा** – श्री. मंदार देशपांडे, द्वारा–ज्ञानेश्वरराव ढगे, स्वदेशी भवन, मगन संग्राहलयाजवळ, बॅचलर रोड, वर्धा ☎ ९४२०४१५६४८

**यवतमाळ** – श्री. उदय नवलेकर, मोरया अपार्टमेंट, प्लॉट नं. २०, बी विंग, यवतमाळ ☎ ९३७२६५०४५२

**उमरखेड** – श्री. धनंजय कुदे, स्टेट बँक कॉलनी, श्रीराम मंदिराजवळ, उमरखेड, जि. यवतमाळ ☎ ९४०३४६००४८

**चंद्रपूर** – श्री. मुकुंद घरोटे, श्रीराम बुक डेपो व स्टेशनर्स, भगतसिंह चौक, पठाणपुरा रस्ता, चंद्रपूर ☎ ९०११६३१६५८

**वरोरा** – श्री. उमेश लाभे, लोकमान्य विद्यालय, ता. वरोरा, चंद्रपूर ☎ ९४०३२४२७०५

## विभाग १४. पुणे - विभाग संपर्कप्रमुख – श्री. रवींद्र भोसले (पुणे) ☎ ९८५०७३१०७१

**पुणे** – छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी, ५१० सदाशिव पेठ, पुणे ४११०३० ☎ ०२०–२४२०७१०६ /१७४

**निगडी** – श्री. प्रमोद सादुल, ज्ञा.प्र. नवनगर विद्यालय, पेठ क्र.२५, निगडी प्राधिकरण, पुणे ☎ ०२०–२७६५४३८०/९८६०६८५१८२

**चिखली** – श्री. गौतम इंगळे, दादासाहेब नाटेकर गुरुकुल चिखली, जि. पुणे ☎ ०२०–२७४९१४९६ / ९७३०२३७३८८

**साळुंब्रे** – श्री. तांबे, ग्राम प्रबोधिनी विद्यालय, साळुंब्रे, ता. मावळ, जि. पुणे ☎ ०२११४–२२३३७१ /९७६७५८०५५३

**शिवापूर** – श्री. संजीव तागडे, कृषीतांत्रिक विद्यालय, ज्ञान प्रबोधिनी, शिवापूर वाडा, ता. हवेली ☎ ०२०–२४३८४०१३/९२७००८४७०९

**इंदापूर** – श्री. तुषार रंजनकर, अल्फाबाईट कॉम्प्युटर्स, नगरपालिकेच्या मागे, इंदापूर ☎ ९४२२३२९६१६

**चाकण** – डॉ. अविनाश अरगडे, महात्मा फुले चौक, चाकण, ता. राजगुरुनगर ☎ ९४२३५७१५५२

**शिरुर** – श्री. प्रशांत अवचट, घर नं. १४३५, हुडको कॉलनी, ता. शिरूर (घोडनदी) ☎ ०२१३८–२२४१६९/९८८१०४९४३८

**बारामती** – सौ. मयुरा कानिटकर, जनहित प्रतिष्ठानचे गुरुकुल, तपोवन कॉलनी, घारे इस्टेट, बारामती ☎ ९४२३५८४३२४

**सासवड** – कल्पना खांडेकर–नागनूर, द्वारा वैद्य घन:शाम खांडेकर, साळी आळी, सासवड, ता. पुरंदर ☎ ९४२३२०८१०१

**भोर** – शुभांगी सदानंद मुकादम, ६१७ आमराई आळी, ता. भोर, ☎ ०२११३–२२२९०३/९६२३०९३९६०

---

**वितरण केंद्र प्रमुखांसाठी : सर्व वितरण केंद्रांवर २१ ऑ टोबर ते २४ ऑ टोबरच्या दरम्यान दिवाळी अंक पाठविले जातील. केंद्रांनी अंकांची नोंदणी ५ ऑ टोबरपर्यंत मुख्य केंद्रावर कळवावी. पुस्तकांची मागणी १५ ऑ टोबरपर्यंत मुख्य कार्यालयात नोंदवावी म्हणजे वाहनाबरोबर ते साहित्य पाठविता येईल. सर्वांनी दिवाळी अंकाच्या हिशोबांपैकी काही देणे राहिले असल्यास ते व सभासद नोंदणी पत्रक व पुस्तके यांचे पैसे १५ ऑ टोबरपूर्वी पुण्यास पाठवावेत.**



हे मासिक ज्ञान प्रबोधिनी या संस्थेच्या मालकीचे असून मुद्रक, प्रकाशक व संपादक श्री. महेन्द्र सेठिया यांनी राष्ट्रीय सौर ९ आश्विन, शके १९३५, १ ऑ टोबर २०१३ या दिवशी बालोद्यान प्रेस, नातूबाग, शुक्रवार पेठ, पुणे –२ येथे छापून, ज्ञान प्रबोधिनी, ५१०, सदाशिव पेठ, पुणे – ३० येथून प्रसिद्ध केले.



खिडकीतून डोकावणाऱ्या प्रकाश किरणांत बालकांच्या टिपलेल्या
कृष्णधवल भावमुद्रा !!



**प्रकाशचित्रे – भरत केतकर**

**सौर आश्विन, शके १९३५/ऑ टोबर२०१३, पंजीकृत नियतकालिक, ISSN 2279 - 0691 Chhatra Prabodhan**
**पंजीकरण क्रमांक** (RNINO.)MAHMAR/2000/5636 **घोषणापत्र क्रमांक :** (PHM/SR/201/VIII/2001)
L-2 / RNP / PNW/M / 94 / 2012 - 2014, **Posted at S.P. Post Office On 1st of Every Month.**

## आम्ही उसळत्या लाटा

आम्ही उसळत्या लाटा चैतन्य सागरीच्या ।। ध्रु. ।।
आम्ही सोत्कंठ भूमिच्या अंकुरल्या आकांक्षा
आम्ही पोलादी पंखांनी झेपावतो दशदिशा
आम्ही अमृतकलश अर्पितो पदी आईच्या ।। १ ।।
आहे ज्वालांशी फुलांशी प्रखर कोमल नाते
आहे तेजस्वी संयत अमुच्या खड्गाचे पाते
दिसो दुरित कोठेही कोसळू मस्तकी त्याच्या ।। २ ।।
आम्ही प्रसन्न पुष्पाच्या उमलत्या पाकळ्या
आम्ही आदित्य तेजाच्या धाकुल्या किरणकळ्या
देवभूमिच्या पूजेत उजळू ज्योती प्राणांच्या ।। ३ ।।



सौर दिनदर्शिका
शके १९३५

| | ऑ टोबर २०१३ | आश्विन कार्तिक |
|---|---|---|
| मं. | 1 | ९ |
| बु. | 2 | १० |
| गु. | 3 | ११ |
| शु. | 4 | १२ |
| श. | 5 | १३ |
| र. | 6 | १४ |
| सो. | 7 | १५ |
| मं. | 8 | १६ |
| बु. | 9 | १७ |
| गु. | 10 | १८ |
| शु. | 11 | १९ |
| श. | 12 | २० |
| र. | 13 | २१ |
| सो. | 14 | २२ |
| मं. | 15 | २३ |
| बु. | 16 | २४ |
| गु. | 17 | २५ |
| शु. | 18 | २६ |
| श. | 19 | २७ |
| र. | 20 | २८ |
| सो. | 21 | २९ |
| मं. | 22 | ३० |
| बु. | 23 | का.१ |
| गु. | 24 | २ |
| शु. | 25 | ३ |
| श. | 26 | ४ |
| र. | 27 | ५ |
| सो. | 28 | ६ |
| मं. | 29 | ७ |
| बु. | 30 | ८ |
| गु. | 31 | ९ |

**पत्त्यामध्ये चुका असल्यास अथवा**
**पिन कोड क्रमांक नसल्यास तातडीने कळवा.**

**संपर्क पत्ता :**
छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी
५१० सदाशिव पेठ, पुणे 411030
☎ (०२०)२४२०७ १७४/१७९
**या अंकाची किंमत : ₹ १५/-**
**वार्षिक वर्गणी : ₹ १८०/-**
**प्रकाशन दिनांक :**
सौर ९ आश्विन, शके १९३५
१ ऑ टोबर २०१३
**www.chhatraprabodhan.org**
**ई-मेल :** chhatraprabodhan@
jnanaprabodhini.org

**प्रिय पोस्टमन,**

हा अंक तुम्ही आमच्या लाड या मुलामुलींपर्यंत पोहोचवून फार मोठं काम करता. मुलंमुली या मासिकाची फार आतुरतेने वाट पाहात असतात. मासिक वेळेवर मिळाले नाही अथवा मिळालेच नाही तर ती नाराज होतात, त्यांचा तुमच्यावरचा अन् आमच्यावरचाही विश्वास कमी होतो. असं झालेलं तुम्हालाही निश्चितच आवडणार नाही. हो ना !

तेव्हा हे मासिक खात्रीशीरपणे, विनाविलंब शेजारच्या (→) पत्त्यावर द्यावे ही आपुलकीच्या नात्याने विनंती,

तुमचा-संपादक, छात्र प्रबोधन.

प्रति -